महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

टाकळी ढोकेश्वर (ता.पारनेर जि.अहिल्यानगर) येथे पोलीस स्टेशन सुरु होण्याबाबत

(१) ४०४ (२६-०४-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाकळी ढोकेश्वर (ता.पारनेर, जि.अहिल्यानगर) येथील आउट पोस्टच्या ठिकाणी नवीन पोलीस स्टेशनला महायुती शासनाच्या काळात मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत तेथे कर्मचारी नियमावलीप्रमाणे नियुक्ती होऊन स्वतंत्र पोलीस स्टेशन म्हणून कामकाज सुरू झालेले नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, टाकळी ढोकेश्वर येथे नवीन मंजूर पोलीस स्टेशन अधिकृतपणे चालू करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री तथा गृहमंत्री व अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग यांना दिनांक २४ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्या दरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने माहिती घेऊन टाकळी ढोकेश्वर येथे नवीन पोलीस स्टेशन अधिकृतपणे सुरु होण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

दि.०४ मार्च, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये टाकळी ढोकेश्वर (ता.पारनेर,जि.अहिल्यानगर) येथील आऊट पोस्टच्या ठिकाणी नवीन पोलीस स्टेशनला मंजूरी दिली आहे.

(२), (३) व (४)

टाकळी ढोकेश्वर पोलीस ठाणे स्वतंत्र पोलीस ठाणे म्हणून कार्यरत होण्यासाठी पारनेर पोलीस ठाणे व टाकळी ढोकेश्वर पोलीस ठाणे या पोलीस ठाण्यांची हद्दनिश्चितीची अधिसूचना, दि.०८ सप्टेंबर, २०२१ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर हद्दनिश्चितीच्या अधिसूचनेमध्ये अंशत: बदल करणे आवश्यक होते, सबब, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाकडून दिनांक १७.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये हद्दनिश्चितीच्या अधिसूचनेचा सूधारित प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर सुधारित हद्दनिश्चतीच्या अधिसूचनेचे प्रारुप महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यास्तव विधि व न्याय विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्याची कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

ठाणे पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात वाढती गुन्हेगारी व लोकसंख्यावाढीमुळे नवीन पाच पोलीस ठाणे सुरु करण्याबाबत

(२) ४८५ (२६-०४-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात वाढती गुन्हेगारी व लोकसंख्यावाढीमुळे अतिरिक्त पोलीस ठाण्यांची आवश्यकता भासू लागल्याने सध्या तक्रारी करण्यासाठी नागरीकांना पायपीट करावी लागत असल्याने नवीन पाच पोलीस ठाणे सुरु करण्यासाठीचा प्रस्ताव ठाणे पोलिस आयुक्तालयाकडून शासनाकडे दिनांक १० जानेवारी, २०२५

वि.स. १७ (2)

रोजी वा त्या दरम्यान शासनाकडे सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी सादर केलेल्या प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०२५) : (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

तथापि, ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत पोलीस स्टेशन निर्मितीचे प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे सादर करण्यात आले आहेत.

सदरहु पोलीस ठाणे निर्मितीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पोलीस महासंचालक कार्यालयाकडून पडताळणी करण्यात येत आहे.

गंगाखेड-राणीसावरगाव (जि.परभणी) रस्त्यावर चालणाऱ्या एका एसटी बसने डिझेल गळतीमुळे पेट घेतल्याबाबत

(३) ५७६ (०८-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगाखेड-राणीसावरगाव (जि.परभणी) रस्त्यावर चालणाऱ्या एका एसटी बसने डिझेल गळती समस्येमुळे पेट घेतल्याची घटना माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गंगाखेड आगारातील एमएच २० / बीएल २६९१ या बसमध्ये डिझेल गळतीची समस्या निर्माण होत असल्याबाबत अनेक चालकांनी गंगाखेड आगारातील तांत्रिकी विभागाकडे नोंद केलेली असतांनाही डिझेल गळती समस्येला गांभीर्याने न घेता, बसची योग्यरितीने दुरुस्ती न केल्यामुळे या एकाच बसला आठवड्यात दोन वेळा आग लागण्याची घटना घडली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डिझेल गळतीच्या समस्येकडे गांभीर्याने न घेता प्रवाश्यांच्या जीवाशी खेळणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रताप सरनाईक (१५-१०-२०२५) : (१) व (२) सदरची घटना गंगाखेड-राणीसावरगाव मार्गावर घडली नसून, गंगाखेड-परभणी या मार्गावर घडली आहे. गंगाखेड आगारातील वाहनाच्या माहे ऑक्टोबर २०२४ ते आग लागण्याच्या घटनेपर्यंतच्या सर्व दोष पत्रिकेची तपासणी केली असता, माहे डिसेंबर २०२४ मध्ये एक वेळा डिझेल गळतीबाबत शेरा नोंदविलेला असून नोंदविलेल्या शेऱ्याप्रमाणे तात्काळ सदर वाहनाची दुरुस्ती करुन घेण्यात आलेली आहे.

(३) व (४) गंगाखेड आगारातील जबाबदार असणाऱ्या संबंधितांना आरोपपत्र देण्यात आलेले आहेत. तसेच आगार व्यवस्थापक, रा.प.गंगाखेड यांचेवर निलंबानाची कारवाई करण्यात आलेली आहे.

मुंबईतील पवई पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणारा अंधेरी (पूर्व) येथील काही भाग एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत समाविष्ट करण्याबाबत

(४) ६३७ (२६-०४-२०२५). श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पवई पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणारा अंधेरी (पूर्व) येथील काही भाग एमआयडीसी पोलीस ठाणे, अंधेरी (पूर्व) पोलीस ठाण्याच्या हद्दीत समाविष्ट करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे फेब्रुवारी, २०२५ रोजी मध्ये केली आहे हे, खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन अंधेरी पूर्व येथील काही क्षेत्र एमआयडीसी पोलीस ठाण्यात समाविष्ट करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

वि.स. १७ (3)

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) अंधेरी पूर्व येथील काही क्षेत्र एमआयडीसी पोलीस ठाणे क्षेत्रात समाविष्ट करण्याच्या अनुषंगाने पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाने दि.१०.०४.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे, अंधेरी एम.आय.डी.सी पोलीस ठाणे व पवई पोलीस ठाणे या पोलीस ठाण्यांच्या हद्दनिश्चितीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. तथापि, सदर हद्दनिश्चितीच्या प्रस्तावात त्रुटी आढळून आल्याने दि.२५.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये त्रुटींची पुर्तता करुन सुधारित हद्दनिश्चितीचा प्रस्ताव सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. सदर बाबतीत अद्याप सुधारित प्रस्ताव शासनास अप्राप्त आहे.

(३)प्रश्न उद्भवत नाही.

संगमेश्वर (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथे स्वतंत्र पोलिस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत

(५) ७२१ (२६-०४-२०२५). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथे त्वरित स्वतंत्र पोलिस आयुक्तालय स्थापन करण्यासाठी सर्वपक्षी कार्यकर्त्यांनी महात्मा गांधी पुतळयापासून अपर जिल्हाधिकारी कार्यालयापर्यत धडक मोर्चा काढून अपर जिल्हाधिकारी यांना निवेदन दिल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने मालेगाव येथे स्वतंत्र पोलिस आयुक्तालय निर्माण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) राज्यात नवीन पोलीस आयुक्तालय निर्माण करणेबाबतचे निकष व मार्गदर्शक तत्वे ठरविणेबाबतची कार्यवाही पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयस्तरावर सुरु आहे. त्याबाबतचा प्रस्ताव अद्याप शासनास अप्राप्त आहे.

राज्यातील भ्रष्टाचाराच्या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याबाबत

(६) ८४८ (२६-०४-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भ्रष्टाचाराच्या (Corruption) प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आलेल्या तब्बल १७३ अधिकाऱ्यांवर अद्याप निलंबनाची कारवाई करण्यात आली नसल्याचे महाराष्ट्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (ACB) आकडेवारीवरून माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आकडेवारीवरुन निलंबीत न झालेले सर्वाधिक अधिकारी हे माहे डिसेंबर, २०२४ पर्यंतचे मुंबई परिक्षेत्रातील म्हणजेच शासनाच्या २१ विभागातील १७३ अधिकारी असून अधिकारी वर्ग-१ मधील २८, वर्ग-२ मधील २८ व वर्ग ३ मधील १०७ आहेत व आतापर्यंत त्यांना निलंबित करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच निलंबन न झालेले बहुतांश अधिकारी हे मुंबई (४७), ठाणे (३८), औरंगाबाद (२१), पुणे (१८), नाशिक (१५), नागपूर (१२), अमरावती (१२) आणि नांदेड (१०) येथील असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ज्या अधिकाऱ्यांना दोषी ठरविण्यात आले आहे, त्यांना नोटिसा देऊन शासनाच्या सेवेतून तात्काळ बडतर्फ करण्यासह प्रत्येक महिन्याला मुख्य सचिवांनी सर्व विभाग प्रमुखांसोबत आढावा बैठक घेऊन कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२५) : (१) माहे जानेवारी २०२५ पर्यत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाचलुचपत प्रकरणी कारवाई करुन देखील एकूण १७३ लोकसेवकांना निलंबित करण्यात आले नव्हते हे खरे असून निलंबित न करण्यात आलेल्या आलोसे यांची अद्यावत माहिती दर महिन्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येते.

(२) व (३) माहे डिसेंबर २०२४ पर्यत शासनाच्या विविध प्रशासकीय विभागातील एकूण १७३ निलंबन न झालेल्या लोकसेवकाबाबतच्या माहितीमध्ये "वर्ग-१" मधील ३०, "वर्ग-२" मधील २८ तसेच "वर्ग-३" व "वर्ग-४" मधील अनुक्रमे १०७ व ८ लोकसेवकाचा समावेश असून निलंबित न झालेले बहुतांश अधिकारी हे मुंबई, ठाणे, औरंगाबाद, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती आणि नांदेड येथील आहेत.

(४) I. यशस्वी सापळा प्रकरणे आणि लाच मागणीच्या प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून थेट कारवाई करुन लाचेचा गुन्हा दाखल करण्यात येतो. तसेच ज्या प्रकरणांमध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून थेट कारवाई करण्यात आली आहे (उदा. यशस्वी सापळा प्रकरणे/ लाच मागणीची प्रकरणे) अशा प्रकरणांमध्ये संबंधीत लोकसेवक ज्या प्रशासकीय विभागाच्या अखत्यारित कार्यरत असेल त्या संबंधित प्रशासकीय विभागामार्फत संबंधित लोकसेवकास निलंबित करण्याची, अभियोगपूर्व मंजुरी देण्याची कार्यवाही तसेच दोषसिध्दी झाल्यानंतर लोकसेवकास शासन सेवेतून बडतर्फ करण्याची कारवाई देखील सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने करण्यात येते.

II. तसेच लाचलुचपतबाबतच्या प्रकरणांमध्ये दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध कार्यवाही करण्याबाबत तसेच इतर प्रकरणांचा शीघ्र गतीने निर्गती करण्यासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तसेच अपर मुख्य सचिव, गृह यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभागाच्या प्रमुखांसोबत नियमितपणे आढावा बैठक घेण्यात येते. सदर आढावा बैठकी दरम्यान संबंधित प्रशासकीय विभागांना लाचलुचपतसंबंधी प्रकरणी तातडीने कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना देण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राजुरा (जि.चंद्रपूर) शहरातील मालगुजारी तलावाचे सुशोभिकरण व तलाव संवर्धन योजने अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्याबाबत

(७) ९४३ (०८-०४-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) : सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा (जि.चंद्रपूर) शहरातील मालगुजारी तलावाचे सुशोभिकरण व तलाव संवर्धन योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २१ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलावाचे सुशोभिकरण व तलाव संवर्धन योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०३-११-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) • राज्य सरोवर संवर्धन योजनेंर्गत राजूरा नगरपरिषद यांच्याकडून प्राप्त मालगुजारी तलाव संवर्धनाच्या रुपये ७,८०,४१,३७६/- इतक्या किंमतीच्या प्रस्तावास सुकाणू समितीच्या मान्यतेनुसार पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग शा.नि.क्र.रासयो २००७/प्र.क्र. ६९/तां.क.३, दि. ११ मार्च, २०१३ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तसेच सदर प्रकल्पासाठी राज्य हिस्सा रक्कम रू.७,०२,३७,२३८/- इतक्या रकमेपैकी अद्यापपर्यंत एकूण रक्कम रुपये २,७३,७९,०००/- इतकी रक्कम वितरीत करण्यात आली आहे.

वि.स. १७ (5)

• तद्नंतर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी मालगुजारी तलाव संवर्धनाचा रुपये १४,५८,००,०००/- इतक्या वाढीव किमतीचा सुधारित प्रस्ताव शासनास दि.२६.०२.२०२४ रोजी सादर केला असून उक्त प्रस्ताव दि. १८.०६.२०२४ रोजी आयोजित सुकाणू समितीसमोर मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता.

• सुकाणू समितीच्या दि. १८.०६.२०२४ रोजी आयोजित बैठकीमध्ये राज्य सरोवर संवर्धन योजनेकरिता कोणतेही एस्कलेशन चार्जेस अनुज्ञेय नसल्याने वाढीव किमतीच्या प्रस्तावास मान्यता देणे शक्य नाही. तथापि, सदर प्रकल्पाकरिता अधिकचा खर्च अपेक्षित असल्यास सदर खर्च नगरपरिषदेमार्फत करण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला असून याबाबत विभागाच्या दि.३०.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये संबंधितांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील नांदेड, किरकटवाडी, नांदोशी, सणसनगर आणि खडकवासला या गावांना पोलिस पडताळणीकरीता खडकवासला किंवा नांदेड सिटी पोलिस ठाण्यात जावे लागत असल्याबाबत

(८) १०१२ (२६-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील नांदेड, किरकटवाडी, नांदोशी, सणसनगर आणि खडकवासला या गावांना पोलिस पडताळणीकरीता खडकवासला किंवा नांदेड सिटी पोलिस ठाण्यात जावे लागत असल्याने स्थानिक नागरिकांना मनात याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावांचा महापालिका हद्दीत समावेश झाल्यानंतरही ग्रामीण पोलिस ठाण्यांच्या हद्दीत ठेवण्यात आले असल्याने सदरहू परिस्थिती टाळण्यासाठी आणि नागरिकांना स्पष्टता देण्यासाठी राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, तसेच नांदेड सिटी पोलिस ठाण्याच्या हद्दीत या गावांचा समावेश करण्याबाबत राज्य शासनाने आदेश जारी केले आहेत काय,

(४) असल्यास, ग्रामीण पोलिस ठाण्यांमधून या गावांचा समावेश शहरी पोलिस ठाण्यात करण्यासाठी राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(५) असल्यास, नांदेड सिटी पोलिस ठाणे कार्यरत असतानाही, या गावांसाठी अद्याप परिपत्रक जारी न केल्यामुळे निर्माण झालेला संभ्रम सोडवण्यासाठी शासनाने कोणती तातडीची उपाययोजना केली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०२५) : (१), (२), (३), (४), (५), व (६) गृह विभाग, शासन निर्णय दि.१०.१०.२०२४ अन्वये सिंहगड रोड पोलीस ठाणेचे विभाजन करुन नवीन नांदेड सिटी पोलीस ठाणे निर्माण करण्यात आले आहे.

तसेच, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, अधिसूचना, दि.५ फेब्रुवारी, २०२५ अन्वये पुणे ग्रामीण कार्यक्षेत्रामधील मौजे नांदेड, नांदेडसिटीसह, मौजे किरकटवाडी, मौजे नांदोशी, मौजे सणसनगर व मौजे खडकवासला या गावांचा समावेश पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या आस्थापनेवरील नांदेडसिटी पोलीस ठाणे अंतर्गत कार्यक्षेत्राच्या हद्दीत करण्यात आला आहे.

करगणी (ता.आटपाडी, जि.सांगली) येथील आटपाडी पोलीस ठाण्याच्या नियंत्रणातील औट पोस्टची इमारत मोडकळीस आल्याबाबत

(९) ११२६ (२६-०४-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करगणी (ता.आटपाडी, जि.सांगली) येथील आटपाडी पोलीस ठाण्याच्या नियंत्रणातील औट पोस्टची इमारत मोडकळीस आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त औट पोस्टला नवीन इमारत तात्काळ द्यावी अशी मागणी करगणी ग्रामपंचायीमार्फत मा.गृह राज्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने निधीची तरतूद करुन नवीन इमारत तात्काळ बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०२५) : (१), (२) व (३) करगणी दूरक्षेत्राकरीता करगणी ग्रामपंचायत हद्दीमध्ये गट नं. १९९८ मध्ये एकूण ०.६१ आर जागा "पोलीस अधीक्षक सांगली" यांचे नावे असून, सदर जागेवर १००० स्क्वेअर फुट आर.सी.सी. बांधकाम असलेली करगणी दुरक्षेत्राची इमारत आहे. सदर इमारत सुस्थितीत असून वापरात आहे. पोलीस अधीक्षक कार्यालयास करगणी ग्रामपंचायत तर्फे करगणी औट पोस्टला नवीन इमारत द्यावी असे कोणतेही निवेदन प्राप्त नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

शालेय शिक्षण विभागातील २४ अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(१०) १४६२ (२७-०४-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागातील एकूण ३२ अधिकाऱ्यांपैकी २४ अधिकारी यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई करुन त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आले असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी त्यांची चौकशी केली असता, त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात अपसंपदा असल्याचे निदर्शनास आल्यानंतर देखील त्यांच्याविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०२५) :(१) होय, हे खरे आहे.

(२) I. सदर प्रकरणी एकूण ३२ अधिका-यांपैकी आलोसे, तत्कालीन शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद सांगली व आलोसे, प्राचार्य (शिक्षण), जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, उस्मानाबाद यांच्या मालमत्तेची उघड चौकशी प्रकरणी अपसंपदा निष्पन्न झाल्याने त्यांच्याविरुद्ध अपसंपदेचे गुन्हे दाखल करण्यात आले असून सदर गुन्ह्याचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरु आहे.

II. १० अधिकारी यांच्या उघड चौकशीमध्ये अपसंपदा निष्पन्न न झाल्यामुळे सदर चौकशी बंद करण्यात आलेली आहे. तसेच ०७ अधिकारी यांच्या सापळा कारवाईच्या दाखल गुन्ह्याबाबत झालेल्या घरझडतीमध्ये अपसंपदा निष्पन्न होईल अशी माहिती मिळून न आल्याने त्यांच्या मालमत्तेची उघड चौकशी करण्यात आलेली नाही.

III. तर उर्वरित एकूण १३ आलोसे यांच्याविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत उघड चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

वि.स. १७ (7)

(३) I. सदर प्रकरणी शालेय शिक्षण विभागाच्या अधिका-यांविरुद्ध दाखल लाचेच्या गुन्ह्याच्या अनुषंगाने आतापर्यंत एकूण २९ अधिका-यांविरुद्ध मा.न्यायालयात अभियोग दाखल करण्यात आले आहे. तर १) आलोसे, तत्कालीन गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती, हवेली, जिल्हा-पुणे व २) आलोसे, तत्कालीन शिक्षण अधिकारी, माध्य. व उच्च माध्यमिक विभाग, जिल्हा परिषद, पालघर यांच्याविरुद्ध शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांच्या दिनांक १७.०९.२०२५ रोजीच्या आदेशान्वये मा.न्यायालयात खटला दाखल करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

II. आरोपी लोकसेविका, तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांच्याविरुद्ध मा.न्यायालयात खटला दाखल करण्यास परवानगी नाकारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील विशेषत: बोरगांव मंजू (जि.अकोला) येथील पोलिस व पोलीस पाटिल यांच्या प्रलंबित मागण्यांसह रिक्त पदे भरण्याबाबत

(११) १५१६ (२६-०४-२०२५). श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय मेश्राम (उमरेड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गावपातळीवर कायदा-सुव्यवस्थेची जबाबदारी सांभाळण्यात मोठा वाटा असलेल्या पोलीस पाटलांच्या काही मागण्या मागील अनेक वर्षापासून शासनाकडे प्रलंबित असून, पोलीस पाटलांची मोठया प्रमाणात पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेषत: बोरगांव मंजू (जि.अकोला) येथे ६७ पोलिसांची पदे रिक्त असल्याने उक्त पोलिस स्टेशनअंतर्गत येणाऱ्या ७२ गावांतील लाखो लोकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी तेथे कार्यरत असणाऱ्या ७१ पोलिस कर्मचाऱ्यांवर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पोलीसांची व पोलीस पाटील यांच्या प्रलंबित मांगण्यासह रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०२५) : (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) व (४) बोरगाव मंजू (जि. अकोला) येथे ६९ पदे रिक्त होती. त्यापैकी २८ पदे भरण्यात आली ४१ पदे रिक्त आहेत. रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हाधिकारी, अकोला यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे. तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या स्तरावर पोलीस प्रशिक्षण केंद्र येथून प्रशिक्षण घेऊन प्रशिक्षणार्थी घटकात परत आल्यानंतर पोलीसांची रिक्त पदे भरण्यात येतील.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील चांदिवली येथील साकिनाका पोलीस वसाहत व साकिनाका पोलीस ठाणे इमारतीचे काम सुरु करण्याबाबत

(१२) १८०४ (२६-०४-२०२५). श्री.दिलीप लांडे (चांदिवली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चांदिवली विधानसभा क्षेत्रातील साकिनाका पोलीस वसाहत व साकिनाका पोलिस ठाण्याच्या इमारतीची दूरवस्था झाली असून धोकादायक अवस्थेत असल्याने पोलिस ठाणे नवीन जागेवर बांधण्याबाबत तसेच पोलिस

वसाहतीचे नुतनीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सातत्याने विविध आयुधांद्वारे व संबंधिताकडे पत्रव्यवहार करुनही आजतागायत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात पोलिस ठाणे इमारतीच्या तळमजल्यावर पाणी जमा होत असल्याने इमारत तातडीने नव्याने बांधण्याबाबत मा.गृह राज्यमंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार केला असता व त्यानुषंगाने मा.मंत्री महोदयांनी प्रत्यक्ष पाहणी केली असतांनाही सदर प्रकरणी शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने पुन:श्च चौकशी अथवा पाहणी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने साकिनाका पोलीस वसाहत व साकिनाका पोलीस ठाणे इमारतीचे काम तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०२५) : (१), (२), (३) व (४) मौजे चांदिवली, साकिनाका, मुंबई येथे न.भू.क्र. ४१ अ या भूखंडावर म्हाडा कार्यालयाने बांधलेल्या इमारत क्रमांक १५, १७, २८, २९ आणि ३० या ०५ निवासी इमारती पोलीस विभागाकडे मालकी तत्वावर आहेत. पोलीस विभागाच्या उक्त पाच इमारतींचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून संरचनात्मक लेखापरीक्षण (Structural Audit) करण्यात आले आहे. सदर ०५ इमारतींपैकी इमारत क्र. २८, २९ आणि ३० या तीन इमारती धोकादायक असल्याचे आणि दुरूस्ती कामे करण्याच्या स्थितीत नसल्यामुळे इमारती रिक्त करणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कळविले होते. सद्यस्थितीत, सदरच्या तीनही इमारती रिक्त करण्यात आलेल्या आहेत. इमारत क्रमांक २८ व २९ मधील तळमजला व पहिल्या मजल्यावरील सदनिकांमध्ये साकीनाका पोलीस ठाणे कार्यरत होते. साकीनाका पोलीस ठाणे हे शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांचेकडील न.भू.क्र. २२,२२/१ ते २०, व्हिलेज चांदिवली, कुर्ला (पश्चिम), मुंबई येथील क्रिस्टल इमारतीमधील एकूण २० संक्रमण सदनिकांमध्ये २८/०९/२०२२ रोजी तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरित करण्यात आले आहे. तसेच इमारत क्र. २८, २९ व ३० मधील रहिवाशांना पोलीस विभागाच्या इतर पोलीस वसाहतीमध्ये स्थलांतरित करण्यात आले आहे.

तसेच इमारत क्र. १५ व १७ या इमारतींच्या दुरुस्तीकरिता सार्वजनिक बांधकाम विभागास रू. ४,०७,६५,६०३/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकांस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका विकास आराखडा २०३४ मध्ये न.भू.क्र. ८३२/ब/२. माहिली व्हिलेज, ता. कुर्ला, मुंबई हा भूखंड नागरी सुविधा केंद्र करिता आणि न.भू.क्र. ४८ फ. चांदिवली, मुंबई येथील ३७३.६९ चौ.मी. क्षेत्रफळाची जागा पोलीस ठाणेसाठी आरक्षित आहे. साकिनाका पोलीस ठाणे इमारतीच्या बांधकामाकरिता न.भू.क्र. ८३२/ब/२, माहिली व्हिलेज, ता. कुर्ला, मुंबई येथील १६२१.७९ चौ.मी. आणि न.भू.क्र. ४८ फ, चांदिवली, मुंबई येथील ३७३.६९ चौ.मी. क्षेत्रफळाचे भुखंड पोलीस विभागास हस्तांतरीत करण्याबाबत प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावावर शासन स्तरावरून दि. ०९/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये काही त्रुटी उपस्थित करण्यात आल्या असून त्रुटी अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

धाराशिव शहरातील जिजाऊ चौकात पोलिस चौकी उभारण्याबाबत

(१३) २२५५ (२५-०४-२०२५). श्री.सुरेश धस (आष्टी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाराशिव शहरातील जिजाऊ चौक पोलीस चौकी मंजूर करणेसंदर्भात अप्पर पोलीस महासंचालक यांनी पो.म.सं./२६-अ/०१४३/०६/२०२४, दि.२३.२.२०२४ रोजी आदेश पारित केलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पत्राच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक, धाराशिव यांनी आनंद नगर पोलीस निरीक्षकाला पत्र पाठवून जबाबदारी नाकारत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील परिसरात शाळा, महाविद्यालय, कोचिंग क्लासेस मोठ्या प्रमाणात असल्याने मुलीची होणारी छेडछाड, टवाळखोरांच्या बंदोबस्तासाठी धाराशिव पोलीस अधीक्षक कोणत्याही प्रकारची यंत्रणा राबवित नसल्याचे

निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील पोलीस चौकी मंजुर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे, तथापि सदरचे आदेश दि.११.१०.२०२४ रोजीचे आहेत.

(२) हे खरे नाही.

(३)हे खरे नाही, पोलीस अधीक्षक, धाराशिव यांनी जिजाऊ पोलीस चौकी येथे पोलीस अंमलदार यांची नेमणूक केलेली आहे. तसेच सदर भागात बीट मार्शल पेट्रोलिंग, छेडछाड विरोधी पथक व जिप पेट्रोलिंग इ.उपाययोजना राबविल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

अंबाजोगाई (जि.बीड) शहरासाठी आणखी एक पोलीस स्टेशन व स्वतंत्र वाहतूक शाखा मंजूर करण्याबाबत

(१४) २५७९ (२८-०४-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील परिसरात जिल्हास्तरीय सर्व कार्यालये कार्यान्वित असून मोठ्या प्रमाणात नागरिक उद्योग धंदे, शिक्षणासाठी, नोकरी निमित्त शहरात स्थलांतरीत झाले असल्याने शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास. त्यामुळे अंबाजोगाई, शहरासाठी आणखी एक पोलीस स्टेशन व स्वतंत्र वाहतूक शाखा मंजूर करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.गृहमंत्री यांच्याकडे दिनांक २१ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०२५) :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मा.लोकप्रतिनिधी यांच्या दिनांक २१.०९.२०२३ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने दि.०६.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयास, निवेदनात नमूद मुद्यांच्या अनुषंगाने वस्तुस्थिती/सुस्पष्ट अभिप्राय शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर बाबतीत क्षेत्रीय स्तरावर पडताळणी सुरु असून, उक्त बाबतीत शासनास अद्याप अभिप्राय अप्राप्त आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

निवृत्त पोलिस बांधवांना मुंबईतच घरे मिळावी आणि मुंबईत सर्वांसाठी पाणी या धोरणावरील स्थगिती उठविण्याबाबत

(१५) २६८३ (२५-०४-२०२५). श्री.महेश सावंत (माहिम), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.हारुन खान (वर्सोवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निवृत्त पोलिस बांधवांना मुंबईतच घरे मिळावी आणि मुंबईत सर्वांसाठी पाणी या धोरणावरील स्थगिती उठवावी यासह अनेक मागण्यांचे लेखी निवेदन दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री महोदय यांना मुंबईतील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनात कोणत्या मागण्या करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, या मागण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०२५) :(१), (२), (३) व (४) बृहन्मुंबई पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांच्या स्वत:च्या कायमस्वरुपी मालकी हक्काच्या निवासस्थानाचा प्रश्न सोडविण्याबाबत तसेच कनकिया सहयोग बी/१ सोसायटी चकाला, अंधेरी पूर्व येथे तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरीत करण्यात आलेल्या पोलीस अधिकारी व अमंलदार यांना ते राहत असलेली निवासस्थाने कायमस्वरूपी त्यांच्या नावावर करून देणेबाबत या विषयाचे श्री. महेश सावंत, श्री. मनोज जामसूतकर, व श्री. मुरजी (काका) पटेल, सर्व मा. वि.स.स. यांचे दिनांक ०३/०३/२०२५, ११/०३/२०२५ व ०३/०४/२०२५ रोजीचे निवेदने शासनास प्राप्त झाले असून त्यानुषंगाने कार्यवाही शासनस्तरावर विचाराधीन आहे.

बॉम्ब शोधक व नाशक पथकात कार्यरत पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना पूर्वीप्रमाणे ५०% जोखीम भत्ता मंजूर करणेबाबत

(१६) २८७४ (२६-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बॉम्ब शोधक व नाशक पथकात कार्यरत पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना पूर्वीप्रमाणे ५०% जोखीम भत्ता मंजूर करणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (औसा) यांनी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०२५) :(१) होय हे खरे आहे.

(२) बॉम्ब शोधक व नाशक पथकातील अधिकारी/कर्मचारी व चालक अंमलदार यांना सातव्या वेतन आयोगानुसार मुळ वेतनाच्या अनुक्रमे २५% व १५% जोखीम भत्ता देण्याबाबतचा शासन निर्णय दि.०५/०९/२०२२ रोजी निर्गमीत करण्यात आलेला असून त्याअन्वये जोखीम भत्ता वितरीत करण्यात येतो.

तसेच बॉम्ब शोधक व नाशक पथकातील अधिकारी/कर्मचारी व चालक अंमलदार यांच्या कामकाजाचे स्वरुप, जबाबदारी व जोखीम यांचा विचार करता, अपवादात्मक बाब म्हणून सदर पथकातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना प्रोत्साहन (जोखीम) भत्ता देण्याबाबत वित्त विभाग आणि तत्कालीन मा.उप मुख्यमंत्री महोदय, यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

मा.सदस्यांच्या निवेदनास अनुसरुन उपरोक्त बाब शासन पत्र दि.०७.१०.२०२५ अन्वये मा.सदस्य महोदय यांना कळविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वि.स. १७ (11)

बाणेर-पुणे येथील तलाठ्याला लाच घेताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केल्याबाबत

(१७) ३१२२ (२७-०४-२०२५). श्री.सुरेश धस (आष्टी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाणेर (जि. पुणे) येथील तलाठ्याला दहा हजार रुपयाची लाच घेताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक २९ डिसेंबर, २०२४ रोजी वा दरम्यान अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी श्री.उमेश विठ्ठल देवघडे, तलाठी व मध्यस्थ, काळुराम मारणे या दोघांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने तलाठी कार्यालयातच रंगेहात पकडून बाणेर पोलीस स्टेशनला त्यांची तक्रार नोंदवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वारस नोंद करण्याकरता तलाठ्याने लाच मागितल्याची तक्रार संबंधित व्यक्तीने केल्यानंतर लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने तलाठ्याचे घर, ऑफिस, बँक-लॉकर मधील दाग-दागिने या कशाचाही तपास न करता कारवाई केली हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास सदर प्रकरणी चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-१०-२०२५) : (१) व (२)

I. प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांच्याकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात आलेल्या लाच पडताळणी कारवाई दरम्यान आलोसे यांनी रु.१०,०००/- इतक्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन झाले.

II. तदनंतर करण्यात आलेल्या सापळा कार्यवाहीप्रकरणी आलोसे, तलाठी, बाणेर सजा कार्यालय यांच्या सांगण्यावरून खाजगी इसम श्री. काळुराम ज्ञानदा मारणे यांना बाणेर सजा कार्यालयाच्या आवारात पंचासमक्ष सदर लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले.

III. त्यानुषंगाने, संबंधितांविरुद्ध बाणेर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.नं १०३०/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ व ७ अ अन्वये दिनांक २८.१२.२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने त्याच दिवशी आलोसे व खाजगी इसम यांना अटक करण्यात आली होती.

(३) हे खरे नाही.

I. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सापळा कारवाई दरम्यान आलोसे तलाठी यांच्या कार्यालयाची झडती घेण्यात असून कार्यालयाचे झडतीदरम्यान तक्रारदार यांच्या प्रलंबित कामासंबंधी मुळ कागदपत्रे हस्तगत करण्यात आली आहेत.

II. तसेच सापळा कारवाई नंतर आलोसे राहत्या घराच्या घरझडतीमध्ये रु.२,२३,६५०/- इतक्या रकमेची मालमत्ता आढळून आलेली असून सदर प्रकरणी तपासात निष्पन्न झालेल्या मालमत्तेसंदर्भात त्यांची उघड चौकशी सुरु करणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

III. तसेच आलोसे वापरत असलेली ४ चाकी कार (अंदाजे किंमत १० लाख रुपये) व कार मध्ये मिळून आलेली रु.३ लाख रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

(४) I. सदर प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्या कार्यालयाच्या दिनांक २७.०१.२०२५ रोजीच्या आदेशान्वये आलोसे यांचे अटक केल्याच्या दिनांकापासून म्हणजेच २८/१२/२०२४ पासून शासन सेवेतून मानीव निलंबन करण्यात आलेले आहे.

II. सदर प्रकरणी दाखल गुन्ह्यात सक्षम मंजुरी प्राप्त झाली असून मा.न्यायालयात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

नांदेड येथे पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत

(१८) ३१७९ (२५-०४-२०२५). अॅड.श्रीजया चव्हाण (भोकर), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील वाढती गुन्हेगारी यापूर्वी झालेले बॉम्बस्फोट आणि खंडणीसाठी झालेल्या हत्या या बरोबरच, विद्यमान लोकसंख्या आणि शहराची झपाट्याने होणारी वाढ या बाबींचा विचार करता स्थानिक नागरिकांबरोबरच सचखंड श्री हजूर साहिब गुरुव्दाराला भेट देणाऱ्या स्थानिक तसेच परराज्यातील आणि परदेशी भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून नांदेड येथे पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड येथे पोलीस आयुक्तालय स्थापन करण्यासंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालय स्तरावर राज्यात नवीन पोलीस आयुक्तालय निर्माण करणेबाबतचे निकष व धोरणाचा मसूदा निश्चित करण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

लातूर शहर व जिल्ह्यातील मुख्य पोलीस ठाणे वगळता ग्रामीण भागातील चौक्यातील दूरध्वनी बंद असल्याबाबत

(१९) ३३८२ (२७-०४-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर शहर व जिल्ह्यातील अनेक ठिकाणी असलेल्या पोलीस चौक्या व ठाण्यातील दूरध्वनी देयके अदा न केल्यामुळे बहुतांशी वेळा बंद असल्याने येथील स्थानिकांना व तक्रारदाराना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे हे खरे आहे का,

(२) असल्यास, त्यामुळे हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधून तक्रार करेपर्यंत वेळ निघून जातो व आरोपी गुन्हा करून पसार होत असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून लातूर शहर व ग्रामीण भागातील पोलीस चौक्या २४×७ कर्मचारी व अधिकारी यांच्यासह खुल्या राहण्याबाबत तसेच महत्वाचे ऑन ड्युटी अधिकारी कर्मचारी यांचे भ्रमणध्वनी क्रमांक शहर व जिल्ह्यात महत्वाच्या ठिकाणी प्रदर्शित करून तो २४ तास कार्यान्वित रहाण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२५) : (१) दूरध्वनी देयके अदा न केल्याने लातूर शहरातील पोलीस ठाणे व चौक्यातील दूरध्वनी बंद आहेत, हे खरे नाही. तथापि, केबल तुटणे किंवा नादुरुस्तीमुळे काही दूरध्वनी बंद आहेत. परंतु, प्रभारी पोलीस स्टेशन यांचे भ्रमणध्वनी क्रमांक दर्शनी भागावर उपलब्ध करुन दिले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) संबंधित ठाणे व चौक्यातील केबल व फोनची दुरुस्ती चालू आहे. तसेच, संबधीत पोलिस स्टेशन प्रभारी अधिकारी यांचा मोबाईल क्रमांक प्रथम दर्शनी फलकावर लावण्यात आलेला आहे. तसेच, लातूर जिल्हयातील महिला, बालके व ज्येष्ठ नागरिक यांना मदतीसाठी डायल ११२ नियंत्रण कक्ष लातूर येथे मोबाईल क्रमांक ९४०४८९९११२ हा चालू आहे. तसेच १०९८ चाईल्ड हेल्प लाईन, १८१ महिला मदत हेल्पलाईन चालू आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही

अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) येथील अतिशय जुन्या व जीर्ण झालेल्या पोलीस स्टेशन इमारत आणि पोलीस निवासस्थानाचे बांधकाम करण्याबाबत

(२०) ३४८० (२७-०४-२०२५). श्री.गजानन लवटे (दर्यापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) येथील पोलीस स्टेशनची इमारत सन १९११ आणि पोलीसांची निवासस्थाने सन १९२८ च्या सुमारास बांधण्यात आली असून, सद्य:स्थितीत सदरहू इमारती अतिशय जुन्या व जिर्ण झाल्याने धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी अंजनगाव सुर्जी येथील बेनार / कृषी विभागामधील १.२० हे. जागा पोलीस विभागाला हस्तांतरण करण्याचा प्रस्ताव पोलीस निरीक्षक, अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनमार्फत पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांचेकडे दिनांक १९ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्या दरम्यान पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास तसेच अंजनगाव सुर्जी येथे पोलीस स्टेशन व पोलीस निवासस्थाने बांधण्याकरीता आवश्यक ती जमीन व निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ३० जानेवारी, २०२५ रोजी वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री तसेच गृह राज्यमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन पोलीस स्टेशन व पोलीस निवासस्थान बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०२५) : (१), (२) व (३) होय.

(४) गृह विभाग, शासन पत्र दि. २४/०९/२०२५ अन्वये मंजूर केलेल्या पोलीस गृहनिर्माण महामंडळाकडून करावयाच्या कामाच्या प्राधान्यक्रम यादीमध्ये अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशन प्रकल्पाचा समावेश आहे. तसेच गृह विभाग, शासन पत्र दि.०७/०२/२०२३ अन्वये मंजूर केलेल्या प्राधान्यक्रम यादीमध्ये अंजनगाव सुर्जी, पोलीस स्टेशन येथे ४४ निवासस्थाने बांधकाम प्रकल्पाचा समावेश आहे. सदर प्रकल्पाची कामे प्राधान्यक्रम व निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्यात येतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे पाटस (ता.दौंड, जि.पुणे) येथील पोलीस स्टेशन निर्मितीचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

(२१) ३४८७ (२७-०४-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवत (ता.दौंड, जि.पुणे) येथील पोलीस स्टेशनचे विभाजन करुन मौजे पाटस (ता.दौंड) येथे नवीन पोलीस स्टेशन निर्माण करण्याबाबत मा.गृहमंत्री महोदयांनी आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पोलीस स्टेशन निर्माण करण्याबाबतचा अहवाल पोलीस महासंचालक यांचेकडून सादर करण्याबाबत दिनांक ५ जानेवारी, २०२४ या दरम्यान पत्र पाठविण्यात आले असून, अद्यापही अहवाल सादर करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अहवाल सादर करून पोलीस स्टेशन निर्माण करण्याबाबत कार्यवाही सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०२५) : (१) सन २०२३ च्या दुसऱ्या अधिवेशनात यवत पोलीस स्टेशनचे विभाजन करुन मौजे पाटस येथे नवीन पोलीस स्टेशन निर्माण करण्याबाबत तत्कालीन मा.गृहमंत्री यांनी आश्वासन दिले आहे.

(२) हे खरे नाही.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडून दि.१०.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये यवत पोलीस

ठाण्याचे विभाजन करुन पाटस येथे नवीन पोलीस ठाणे निर्मितीबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे.
(३) यवत पोलीस ठाण्याचे विभाजन करुन पाटस येथे नवीन पोलीस ठाणे निर्मिती करण्याचा प्रस्ताव वित्त विभागास मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

दौंड (जि.पुणे) येथील पोलीस अधिकारी व कमर्चारी निवासस्थानाच्या बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत

(२२) ३४८८ (२७-०४-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि.पुणे) येथील १०९ पोलीस अधिकारी व कमर्चारी निवासस्थानांचे बांधकामास दिनांक २९ जानेवारी, २०२४ रोजीच्या पत्रान्वये परवानगी मिळाली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी अद्याप जागेचा प्रश्न, निधी वितरण व प्रशासकीय मान्यता मिळाली नसल्याने प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर इमारतीसाठी राज्य राखीव पोलीस दलाची जागा मिळण्यासाठी प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०२५) : (१), (२), (३), (४) व (५)

शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या प्राधान्यक्रम यादीत दौंड (जि. पुणे) येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या १०५ निवास्थानाच्या बांधकामाचा समावेश आहे. यानुसार पोलीस गृहनिर्माण महामंडळाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच दौंड (जि. पुणे) येथील पोलीस अधिकारी कर्मचारी यांची १०५ निवासस्थाने बांधकामासाठी करण्यासाठी राज्य राखीव पोलीस दलाची जागा पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना हस्तांतरीत करणेबाबतची कार्यवाही चालू आहे.

माहूर (जि.नांदेड) तालुक्यातील निजाम कालीन सिंदखेड पोलीस ठाणे स्थलांतरीत करण्याबाबत

(२३) ३८०१ (२९-०४-२०२५). श्री.भीमराव केराम (किनवट) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहूर (जि.नांदेड) तालुक्यातील निजाम कालीन सिंदखेड पोलीस ठाणे वाई बाजार येथील गृह विभागाच्या अखत्यारितील जागेत स्थलांतरित करावे अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंदखेड पोलीस ठाणे अंतर्गत ५२ गावांचा कारभार शंभर वर्षापेक्षा जुन्या व जीर्ण इमारतीत सुरु असून या इमारतीमध्ये भौतिक सुविधेचा वानवा असल्याने पोलीस ठाणे स्थलांतरीत करण्याची नितांत आवश्यकता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सारखणी आणि वाई बाजार सारखे किनवट आणि माहूर तालुक्यातील दोन प्रमुख बाजारपेठ सिंदखेड पोलीस ठाणे अंतर्गत येत असल्याने सुरक्षेच्या कारणाने सुद्धा राष्ट्रीय महामार्गापासून पाचशे मीटर अंतरावर वाई बाजार येथे पोलीस ठाणे स्थलांतर झाल्यास नागरिकांना सुद्धा सोयीचे ठरणार आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. १७ (15)

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०२५) : (१) याबाबत कोणताही पत्रव्यवहार पोलीस स्टेशन किंवा पोलीस अधीक्षक, नांदेड या कार्यालयास करण्यात आलेचे दिसुन येत नाही.

(२) शासन पत्र क्र. बांधका ०१२३/प्र.क्र. ०५/पोल-७, दि. ०७/०२/२०२३ अन्वये मान्यता प्रदान केलेल्या गृहनिर्माण महामंडळाकडून बांधकाम करावयाच्या प्राधान्यक्रम यादीत सिंदखेड पोलीस ठाणे व शासकीय निवासस्थान बांधकामाचे काम याचा समावेश आहे. त्यानुसार गृहनिर्माण महामंडळाकडून स्थपती प्लॅनर्स अ‍ॅन्ड डेव्हलोपर्स प्रा.लि., छत्रपती संभाजीनगर यांची पी.एम.सी. म्हणुन नियुक्ती करण्यात आली असुन त्यांनी पोलीस स्टेशन सिंदखेड करिता उपलब्ध जागेची स्थळ पाहणी (सर्वे) दिनांक २५/११/२०२४ रोजी केली आहे.

(३) पोलीस ठाणे सिंदखेड अंतर्गत दोन प्रमुख बाजारपेठ ०१) सारखणी ०२) वाई (बा) हे असुन या दोन्हीही बाजारपेठे पासुन ५०० मीटरच्या अंतरावर राष्ट्रीय महामार्ग आहे. यामुळे सारखणी व वाई (बा) बाजारपेठ या बाजारपेठेत पोलीस मदत केंद्र उभारण्यात आले असुन त्याठिकाणी सर्व नागरिकांना योग्य त्या सुविधा पुरविण्यात येते.

(४) वर नमूद (२) नुसार कार्यवाही चालू आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात वेगवेगळया वर्गातील २७ हजार नोंदणीकृत संस्थेतील धर्मदाय कार्यालयातील पदे रिक्त असल्याबाबत

(२४) ४०५८ (२९-०४-२०२५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर जिल्ह्यात वेगवेगळया वर्गातील २७ हजार नोंदणीकृत संस्था कार्यरत असून धर्मदाय कार्यालयात एकूण ३७ पदे मंजूर असून यापैकी १९ इतकी म्हणजे ५० टक्के पदे रिक्त असल्यामुळे मनुष्य बळाअभावी ट्रस्ट तपासणी, वादविवादावर न्याय देणे व इतर कामकाजावर परिणाम होत असल्याबाबत माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहिल्यानगर जिल्ह्यातील धर्मदाय आयुक्त कार्यालयात सहाय्यक धर्मदाय उपायुक्तांचे दोन पैकी १ पद रिक्त आहे, प्रशासन अधिकारी हे एकच पद मंजूर असून तेही रिक्त आहे, निरीक्षकांच्या ११ पदापैकी ४ पदे रिक्त आहेत. लघुलेखकाची ३ पदे मंजूर असून पैकी २ रिक्त आहेत. वरीष्ठ लिपीकाची ६ पदे मंजूर असून ३ रिक्त आहेत. कनिष्ठ लिपीकाची ८ पदे मंजूर रिक्त आहेत. आदेशिका वाहकाची दोन पदे मंजूर असून दोन्हीही पदे रिक्त आहेत, दप्तरी पदाचे १ पद मंजूर असून ते ही रिक्त आहे व शिपाई पदाच्या ४ पैकी ३ पदे रिक्त आहेत. अशी ५० टक्के पदे रिक्त असल्याने संस्था नोंदणी, तपासणी, संस्था पदाधिकारी चेंज रिपोर्ट अंतर्गत वाद विवाद निवाडे, व इतर कामे होण्यास दिरंगाई होवून कामकाजावर परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन अहिल्यानगर जिल्ह्यातील २७ हजार नोंदणीकृत संस्थाचे कामकाज वेळेवर होण्यासाठी धर्मदाय आयुक्त कार्यालयातील रिक्त पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१०-२०२५) :(१), (२), व (३)

विधि व न्याय विभागाच्या दि.२०.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये धर्मादाय संघटनेच्या आस्थापनेवरील १४६६ नियमित पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहिल्यानगर या कार्यालयात एकूण ३४ पदे मंजूर करण्यात आलेली आहे.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहिल्यानगर कार्यालयात सहायक धर्मादाय आयुक्त-१ पद, प्रशासकीय अधिकारी-१, लघुलेखक (नि.श्रे.)-२, निरीक्षक-३, वरिष्ठ लिपीक-२, लिपिक-टंकलेखक-२, आदेशिका वाहक-२, आणि दप्तरी-१ अशी एकूण १४ पदे रिक्त आहेत.

सहायक धर्मादाय आयुक्त या रिक्त पदाची प्रकरणे इतर कार्यरत अधिकारी यांचेकडे विभागून देण्यात आलेली आहेत.

धर्मादाय संघटना कार्यालयांतील प्रलंबितता कमी करण्यासाठी /कामांचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी

मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार माहे ऑक्टोबर २०२४ ते जानेवारी २०२५ या ४ महिन्यांत विशेष मोहिम राबविण्यात आली असून प्रलंबितता कमी करण्यात आली आहे.

सहायक धर्मादाय आयुक्त व प्रशासकीय अधिकारी या पदांचे सेवाप्रवेश नियम सुधारित करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू असून, सुधारित सेवाप्रवेश नियम अधिसूचित झाल्यानंतर सदर पदांवर प्राधान्याने पदभरती करण्यात येईल. धर्मादाय संघटनेच्या आस्थापनेवरील विधि सहायक व लघुलेखक (उच्च श्रेणी), (कनिष्ठ श्रेणी) गट-ब (अराजपत्रित) तसेच निरीक्षक व वरिष्ठ लिपिक, गट-क संवर्गातील रिक्त पदांकरिता दि.०९.०९.२०२५ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शिफारस केलेल्या २ लिपिक-टंकलेखक यांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आलेले असून अद्याप उमेदवार रुजू झालेले नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

''कृष्णासागर बहुळा'' प्रकल्प (ता.पाचोरा, जि. जळगांव) येथील पर्यटन विकास विकसित करण्याकरीता वाढीव निधी मंजूर करण्याबाबत

(२५) ४१५५ (२७-०४-२०२५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ''कृष्णासागर बहुळा'' प्रकल्प (ता.पाचोरा, जि. जळगांव) येथील पर्यटन विकसित करण्याकरिता टप्पा २ साठी ५ कोटी रुपये वाढीव निधी मंजूर होणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास मा. पर्यटन, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन लेखी निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंभूराज देसाई (११-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडून रु.५.०० कोटी रकमेचा प्रस्ताव पर्यटन संचालनालयामार्फत छाननी नंतर विभागास प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्ताव मान्यतेसाठी पर्यटन विभाग, शासन निर्णय दि.०४/११/२०१० नुसार राज्य पर्यटन विकास समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

चिपळूण जिल्ह्यातील सरोवर संवर्धन योजना अंतर्गत विरेश्वर आणि रामतिर्थ तलावाचे संवर्धन करण्यास निधी देण्याबाबत

(२६) ४६४१ (०१-०५-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) : सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण शहरातील विरेश्वर आणि रामतिर्थ ही दोन्ही तलाव ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेली महत्वाची स्थळ असून शहराच्या मध्यवर्ती भागात असल्याने आणि निसर्गरम्य वातारवणामुळे या दोन्ही तलावांना प्रसिध्दी मिळाली आहे, मात्र तलावांची देखभाल व दुरुस्ती तसेच सौदर्यंकरण अभावी गैरसोयी निर्माण होत आहेत. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत सुकाणू समितीची बैठकीमध्ये चिपळूण नगरपरिषद हद्दितील राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत विरेश्वर आणि रामतिर्थ या दोन तलावाचे संवर्धन करणे प्रस्तावास अंतिम मान्यता मिळून त्यास प्रशासकीय मान्यतेची शिफारस झालेली होती. हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चिपळूण नगरपरिषद हद्दितील विरेश्वर तलावाचे संवर्धनाकरीता रुपये १ कोटी ५१ लाख ६५ हजार ६६४

चा प्रस्ताव सन २०२२-२३ मध्ये तर रामतिर्थ तलावाचे संवर्धनाकरीता रुपये ३ कोटी ७९ लाख ८३ हजार ७०९ चा प्रस्ताव सन २०२३-२४ मध्ये शासन स्तरावर पर्यटन विभागाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अद्यापही या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्राप्त नसल्याने निधीची मिळाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, तलावांचे संवर्धन आणि सौंदर्यकरण झाल्यास, चिपळूणचे पर्यटन वाढण्यास मदत होऊन तसेच, स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळेल. याकरीता राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत निधीची तरतुद होणेकामी प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळण्याच्यादृष्टिने शासनाकडून कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०३-११-२०२५) :१) मुख्याधिकारी, चिपळूण नगरपरिषद यांनी दि.०७/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये हे खरे असल्याचे कळविले आहे.

२), ३), ४) व ५)

- राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत मुख्याधिकारी, चिपळूण नगरपरिषद यांच्यामार्फत प्राप्त विरेश्वर तलाव संवर्धनाचा रुपये १,५१,६५,६६४/- किमतीचा प्रस्ताव व रामतीर्थ तलाव संवर्धनाचा रुपये ४,०५,७०,००४/- किमतीचा प्रस्ताव अनुक्रमे दि.१७.०३.२०२२ रोजी व दि.३१.१०.२०२३ रोजी सुकाणू समितीसमोर ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावांस सूकाणू समितीच्या शिफारशींनुसार अनुक्रमे दि.३१.०३.२०२२ व दि.२६.०२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये अटी व शर्तींच्या अधीन राहून तत्वत: मान्यता देण्यात आली होती.
- तद्नंतर मुख्याधिकारी, चिपळूण नगरपरिषद यांनी सादर केलेल्या सुधारित प्रस्तावास सूकाणू समितीमार्फत दि. २७.०२.२०२३ रोजी एकूण रक्कम रुपये १,३१,८२,६९७/- इतक्या मर्यादेत अंतिम प्रशासकीय मान्यता देण्याची शिफरस करण्यात आलेली आहे.
- तसेच मुख्याधिकारी, चिपळूण नगरपरिषद यांनी सादर केलेल्या एकूण रक्कम रुपये ३,७९,८३,७०९/- किंमतीच्या सुधारित प्रस्तावास सुकाणू समितीमार्फत दि.२०.०९.२०२४ रोजी अंतिम प्रशासकीय मान्यता देण्याची शिफारस करण्यात आली आहे.

सांगली जिल्हयातील पोलीस ठाण्यात प्राथमिक सुविधा देण्यासह रिक्त पदे भरण्याबाबत

(२७) ५३९१ (२६-०४-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील पोलीस दलात नवनवे तंत्रज्ञान येत असताना प्राथमिक सुविधांचा अभाव असून महिला पोलीसांसाठी स्वच्छतागृहे व विश्रांतीगृहे नसणे, अनेक पोलीस ठाण्यात स्वच्छतागृहांची स्वच्छता होत नसणे, तसेच पोलीस वसाहतींची अत्यंत दुरवस्था झाली असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच सांगली जिल्हयाच्या ३० लाख लोकसंख्येचा सुरक्षेचा भार २५०० पोलीसांवर असून पोलिसांची अनेक पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन सांगली जिल्हयातील पोलीस ठाण्यात प्राथमिक सुविधा देण्यासह रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०२५) :(१), (२) व (३) पोलीस अधीक्षक, सांगली यांच्या आस्थापनेवरील तासगांव, आटपाडी विटा येथे नविन शासकिय निवासस्थानाचे बांधकाम करण्यात आले आहे. तसेच कडेगांव पोलीस ठाणे अंतर्गत ५९ व पोलीस मुख्यालय सांगली येथे २२४ नविन शासकिय निवासस्थानाचे बांधकाम सुरु आहे. सद्यस्थित सांगली जिल्हा पोलीस अधिकारी / अंमलदार यांचेकरिता वापरात असलेल्या निवासस्थानाची संख्या ९०१ इतकी आहे. तसेच पोलीस स्टेशन, उमदी व भिलवडी येथे नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाचे काम गृह

विभाग, शासन पत्र दि. २४/०९/२०२५ अन्वये पोलीस गृहनिर्माण महामंडळाच्या प्राधान्यक्रम यादीत घेण्यास मंजूरी देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जिल्हयातील पोलीस ठाणे व महिला/पुरुष स्वच्छतागृहामध्ये स्वच्छता ठेवण्यासाठी अंशकालीन सफाईगार यांच्या नेमणुका करण्यात आलेल्या आहेत.

सांगली जिल्हा पोलीस दलामध्ये पोलीस शिपाई या पदाची रिक्त असलेल्या ५९ जागा पोलीस भरतीवेळी भरण्याबाबत शासनाने मंजूरी दिलेली असून रिक्त पदे पोलीस भरती वेळी भरण्यात येतील. तसेच महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेल्या विहित निकषानुसार व मंजूर केलेल्या सुधारीत आकृतीबंधानुसार आवश्यकतेनुसार पुरेसे मनुष्यबळ आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी झोपडीधारकास पात्र करून घेण्यासाठी म्हाडाच्या कार्यकारी अभियंत्यासह तिघांनी लाच मागितल्याबाबत

(२८) ५७७३ (२६-०४-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी 'परिशिष्ट-२' मध्ये (पात्रता यादी) झोपडीला पात्र करून घेण्यासाठी झोपडीधारकांकडे साडेसहा लाखांची लाच मागणाऱ्या म्हाडाच्या कार्यकारी अभियंत्यासह तिघांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) दिनांक ६ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या दरम्यान अटक केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०२५) :(१) सदर प्रकरणी तिनही आरोपींना दिनांक ०५.०२.२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे ही बाब खरी आहे.
(२) व (३)
I. सदर प्रकरणी फिर्यादी यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, शासनाच्या अभय योजनेअंतर्गत त्यांच्या काकाच्या नावे असलेली रुम फिर्यादी यांच्या नावे हस्तांतरण करण्यासाठी आलोसे क्र.१, कार्यकारी अभियंता (म्हाडा), बोरीवली विभाग/मुंबई मंडळ, बांद्रा, मुंबई यांनी फिर्यादी यांच्याकडे त्यांच्या व इतर १० झोपडपट्टीधारक यांच्या प्रलंबित कामासाठी प्रत्येकी ६०,०००/- असे एकूण रु.६,६०,०००/- इतक्या लाचेच्या रकमेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम आरोपी क्र.२, खाजगी इसम यांच्याकडे देण्यास सांगितल्याचे पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान निष्पन्न झाले.
II. तदनंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात आलेल्या सापळा कारवाई मध्ये आरोपी क्र. २ खाजगी इसम याने रु.६०,०००/- इतकी लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारुन ती आरोपी क्र. ३, खाजगी इसम याच्याकडे दिली असता, सापळा पथकाने नमूद दोन्ही खाजगी इसम यांना ताब्यात घेवून त्यांचेकडून लाचेची रक्कम हस्तगत केली.
III. म्हणून या प्रकरणी तिन्ही आरोपीतांविरुद्ध फिर्यादी यांनी दिलेल्या प्रथम खबरी अहवालावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे गु.र.क्र. ०६/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) च्या कलम ७, ७ (अ), १२ प्रमाणे दिनांक ०५.०२.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचा सखोल तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरु आहे.
IV. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने तिन्ही आरोपींना त्याच दिवशी अटक करण्यात आली असून दिनांक ११.०२.२०२५ रोजी तीनही आरोपीतांना जामीन मंजूर करण्यात आलेला आहे.
V. सदर प्रकरणी आलोसे, कार्यकारी अभियंता (म्हाडा), बोरीवली विभाग/मुंबई मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

महाराष्ट्रातील दस्तऐवज परीक्षण शाखा राज्य गुन्हे अन्वेषण विभागातून (CID) मुक्त करून न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांच्यामध्ये विलीन करण्याबाबत

(२९) ५८०१ (२६-०४-२०२५). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील दस्तऐवज परीक्षण शाखा (Question Documents Examiners or Handwriting Experts) राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या (CID) अधिपत्याखाली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशातील बहुतांश राज्यांमध्ये दस्तऐवज परीक्षण विभाग, संबंधीत राज्यातील न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोग शाळांच्या अधिपत्याखाली कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, फौजदारी न्याय प्रक्रीया उत्तम व अधिक गतिशील करण्यासाठी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने सुचविलेल्या शिफारशी नुसार महाराष्ट्रातील दस्तऐवज परीक्षण शाखा राज्य गुन्हे अन्वेषण विभागातून (CID) मुक्त करून 'न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या अधिपत्त्याखाली आणणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तसेच वाढत्या फौजदारी गुन्ह्यांच्या तुलनेत हस्ताक्षर तज्ञांच्या संख्येत वाढ करणे गरजेचे आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महाराष्ट्रातील दस्तऐवज परीक्षण शाखेकडून 'न्यायसहायक वैज्ञानिक' प्रयोगशाळेत विलीन करण्याची मागणी सातत्याने होत आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे काय,

(७) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) देशातील काही राज्यांमध्ये दस्तऐवज परीक्षण विभाग न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांच्या अधिपत्याखाली कार्यरत आहे.

(३) यासंदर्भात गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य,पुणे कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या दस्तऐवज परीक्षण शाखेचे न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयामध्ये विलिनीकरण करणेबाबत प्रस्ताव विचाराधीन नाही.

(४) यासंदर्भात पोलीस महासंचालक कार्यालयाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येईल.

(५) व (६) या विषयाबाबत शासनस्तरावर प्राप्त झालेल्या मागणीच्या अनुषंगाने शासन पत्र दि. ०३.०७.२०२५ अन्वये तपासून कार्यवाही करण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयास कळविण्यात आले आहे.

(७) प्रश्न उदभवत नाही

गणेशमूर्तीकरिता पीओपीसारखे साधर्म्य असलेले साहित्य उपलब्ध करून देण्याबाबत

(३०) ५९८२ (२७-०४-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) : सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गणेशमूर्तीकार संघटनेने प्लास्टर ऑफ पॅरिसला पर्याय म्हणून पीओपीसारखे साधर्म्य असलेले साहित्य उपलब्ध करून देऊन त्यानंतरच पीओपीवर बंदी घालण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी मा. मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्लास्टर ऑफ पॅरिसला पर्याय न देता घालण्यात आलेल्या बंदीमुळे हजारो गणेशमूर्तिकार कामगारांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

वि.स. १७ (20)

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन गणेशमूर्तीकारांनी केलेल्या मागणीनुसार पीओपीसारखे साधर्म्य असलेले साहित्य उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२९-१०-२०२५) : (१)अश्या स्वरुपाचे निवेदन मा. मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झाले आहे.

(२), (३) व (४)

• केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दि. १२ मे, २०२० च्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्लास्टर ऑफ पॅरिस पासून बनविण्यात येणाऱ्या मूर्त्यांवर बंदी घालण्यात आली होती. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहीत याचिका क्र. ९६/२०२४ व इतर न्यायालयीन प्रकरणे दाखल करण्यात आली आहेत.

• मूर्ती तयार करण्यासाठी प्लास्टर ऑफ पॅरीसचा (पी. ओ. पी.) वापर आणि मूर्तीच्या विसर्जनामुळे जलस्रोतांवर होणारे परिणाम याबाबत शास्त्रीय दृष्ट्या अभ्यास करून शासनास शिफारस करण्याकरिता गठीत केलेल्या समितीचा अहवाल पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास सादर केला होता. त्यानुसार पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडून सदर अहवाल केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे अवलोकनार्थ व विचारार्थ पाठविण्यात आला होता.

• केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने नेमलेल्या तज्ञ समितीच्या शिफारशी विचारात घेऊन मा. उच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक ९ जून, २०२५ रोजीच्या आदेशान्वये केवळ प्लास्टर ऑफ पॅरीस (पी.ओ.पी.) मुर्ती बनविण्यावरील बंदी उठविली होती. तथापि, राज्य शासनास प्लास्टर ऑफ पॅरीस (पी.ओ.पी.) मूर्ती विसर्जनाबाबत धोरण तयार करणेबाबत सूचना दिल्या होत्या.

• त्यानुषंगाने पर्यावरण पूरक सण साजरे करण्याच्या अनुषंगाने प्लास्टर ऑफ़ पॅरीस (पी.ओ.पी.) मूर्ती विसर्जनाबाबतच्या मार्गदर्शक सूचना दि. दि. ०१ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहे.

पुणे पोलीस दलात ९५०० पोलिसांसाठी केवळ ९०५ इतकीच वाहने उपलब्ध असल्याबाबत

(३१) ६०७३ (२६-०४-२०२५). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्याची जबाबदारी असलेल्या पोलिसांना आरोपींची कोर्टात ने आण करण्यासाठी वाहनाची प्रतीक्षा करावी लागत असल्याचे दिनांक १५ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

२) असल्यास, पुणे पोलीस दलात ९५०० पोलिसांसाठी केवळ ९०५ इतकीच वाहने उपलब्ध असल्याने त्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन पोलिसांना पुरेशी वाहने उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२५) : (१) हे खरे नाही.

येरवडा मध्यवर्ती कारागृह येथील बंदीना कोर्टात ने-आण करण्यासाठी एकूण ०५ वाहने कायमस्वरुपी उपलब्ध आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

गृह विभाग, शासन निर्णय दि. ०५.१२.२०१७ रोजीच्या वाहन धोरणानुसार पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या आस्थापनेवर एकूण ८२९ वाहने अनुज्ञेय आहेत. तथापि, पुणे शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार वाढविण्यात आलेल्या

पोलीस स्टेशन/चौकी करिता पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या आस्थापनेवर सद्यस्थितीत एकूण ९२६ वाहने उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

गृह विभाग, शासन निर्णय दि. ३१.०७.२०२४ अन्वये राज्य पोलीस दलातील वाहन अनुज्ञेयतेच्या धोरणानुसार कमतरता असलेली २२९८ वाहने खरेदी करण्याबाबत सन २०२४-२५ ते सन २०२७-२८ या कालावधीमध्ये ०५ वर्षाचा कृति आराखडा निश्चित करण्यात आलेला आहे.

तसेच, राज्य पोलीस दलासाठी सुधारित वाहन धोरण तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही

मौजे कुंभोज (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील गावतलाव प्रदूषणमुक्त करण्याच्या कामाबाबत

(३२) ६६०६ (०५-०५-२०२५). श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र (हातकणंगले) : सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुंभोज (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील गाव तलाव प्रदूषण मुक्त करण्याचे काम राज्य सरोवर संवर्धन योजनेतून देण्यात येणाऱ्या निधी अंतर्गत सादर केलेला दोन कोटींचा प्रस्ताव गेले अनेक वर्षे मंजूर न झाल्याने प्रलंबित असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा प्रस्तावाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने उक्त प्रस्तावास मंजूरी देणेसह निधी कधीपर्यंत मंजूर करण्यात येणार याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०३-११-२०२५) : (१) हे खरे नाही.

(२) राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत मौजे कुंभोज (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील गाव तलाव संवर्धन प्रस्ताव दि. १७ डिसेंबर, २०१८ रोजी आयोजित सुकाणू समितीच्या बैठकीत मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. सदर बैठकीत सुकाणू समितीमार्फत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेला सुधारित प्रकल्प अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्यामार्फत मौजे कुंभोज (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील गाव तलाव संवर्धनाचा सुधारित प्रस्ताव दि. २३ मे, २०२५ रोजी शासनास प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात इतर मागास बहुजन विद्यार्थ्यांसाठी असलेली परदेशी शिक्षणासाठीच्या शिष्यवृत्ती मध्ये झालेला गैरव्यवहार

(३३) ७०५९ (२७-०४-२०२५). श्री.अमोल खताळ (संगमनेर) : सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इतर मागास बहुजन विद्यार्थ्यांसाठी असलेली परदेशी शिक्षणासाठीच्या शिष्यवृत्ती मध्ये शासनाच्या वर्ग एक अधिकाऱ्यांनी स्वतःला मजूर दाखवून गैरव्यवहार केल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात खोटे उत्पन्नाचे दाखले व अहवाल देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

वि.स. १७ (22)

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिष्यवृत्ती मध्ये गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अतुल सावे (१०-१०-२०२५) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर विद्यार्थिनीस परदेशी शिष्यवृत्तीपोटी अदा करण्यात आलेली शिष्यवृत्ती व इतर रक्कम व्याजासह वसूल करण्याबाबत संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांना दिनांक १९.०६.२०२५ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात नवीन १६ कारागृह बांधण्याकरिता आवश्यकतेनुसार प्रस्ताव मंजूर करण्याकरिता निधीची उपलब्ध करुन देण्याबाबत

(३४) ७१७१ (०७-०८-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : दिनांक १७ जुलै, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक १०५४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तुरुंगामध्ये कैद्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून मंजूर क्षमतेच्या १४९ टक्के कैद्यांची संख्या अधिक असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील तुरुंगात गत तीन वर्षात सुमारे ४०,६३४ कैदी होते, त्यावेळी तुरुंगाची मंजूर क्षमता फक्त २७,१८४ होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे राज्यातील नव्याने पिंपरी चिंचवड, नागपूर, मानखुर्द, सातारा इत्यादी १६ ठिकाणी कारागृहाचे बांधकाम करण्याबाबत जमीन अधिग्रहण करण्याची कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई तसेच राज्यातील कारागृहात पुरेशी जागा नसल्याने विविध अडचणी निर्माण झाल्या असून कैद्यांना झोपण्यासाठी जागा उपलब्ध नसणे, स्वच्छतेचा अभाव, अपुरी स्वच्छतागृहे ,गुदमरणारे वातावरण, अपुरी आरोग्य सेवा यामुळे कैद्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन या तुरुंगातील तीव्र गर्दीचे निराकरण करण्यासाठी नवीन १६ कारागृह बांधण्याकरिता आवश्यकतेनुसार प्रस्ताव मंजूर करण्याकरिता निधीची उपलब्धता करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०२५) :(१) अंशत: खरे आहे.

राज्यातील कारागृहांची अधिकृत एकूण बंदीक्षमता २७,१८४ इतकी असून, माहे मे, २०२५ अखेर प्रत्यक्षात एकूण ३९,५२७ इतके बंदी होते.

(२) मागील तीन वर्षात राज्यातील कारागृहात असलेल्या बंद्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे:-

सन अधिकृत बंदी क्षमता प्रत्यक्ष बंदी क्षमता

२०२२ २५४४३ ४१०७०

२०२३ २६२८१ ४०८०५

२०२४ २७११० ३९००३

(३) होय, हे खरे आहे.

राज्यात नव्याने पिंपरी चिंचवड, नागपूर, मानखुर्द व सातारा इत्यादींसह १६ ठिकाणी नवीन प्रस्तावित कारागृहाच्या निर्मितीसाठी जमीन अधिग्रहण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) राज्यात अस्तित्वातील कारागृहात ८९५ बंदी क्षमतेच्या ३५ नविन बॅरेकचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सन २०२५-२६ मध्ये २७ नविन बॅरेक बांधकामास मंजूरी देण्यात आली आहे. कारागृहामध्ये गुदमरणारे वातावरण होऊ नये म्हणून प्रत्येक बॅरेकमध्ये वायुविजनसाठी सिलिंग फॅन बसविण्यात आले आहेत.

तसेच राज्यातील कारागृहात सद्यस्थितीत ६२५२ शौचालये, ९५१ स्नान ओटे, ७१८ स्नानगृहे अस्तित्वात आहेत. तसेच २३६ शौचालये, २० स्नानओटे, २६ स्नानगृहांची बांधकामे प्रगतीपथावर आहेत.

कारागृहामधील बंद्यांच्या मानसिक व शारिरीक आरोग्याची विशेष तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांद्वारे दर आठवड्याला तपासणी करण्यात येते. तसेच विविध निमशासकीय तथा स्वयंसेवी संस्थांमार्फत वैद्यकीय शिबिराचे वेळोवेळी आयोजन करून समुपदेशन देखील केले जाते.

(५) तुरुंगातील अती गर्दीचे निराकरण करण्यासाठी राज्यात एकूण १६ नवीन कारागृह बांधण्याचे प्रस्तावित आहे. त्यापैकी सातारा, सांगली, नांदेड व बीड या ठिकाणी नवीन जागा निश्चित करण्यात आली आहे. सदर जागा प्रत्यक्ष कारागृह विभागाच्या ताब्यात प्राप्त झाल्यानंतर आवश्यकते नुसार आर्थिक तरतूद करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

भिंगार (ता.पनवेल, जि.रायगड) येथील विज महावितरणच्या दोन अभियंत्याना कामाच्या देयकासंदर्भात लाच घेतल्याबाबत

(३५) ७२१७ (१९-०९-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिंगार (ता.पनवेल, जि.रायगड) येथील महावितरणच्या दोन अभियंत्याना कामाच्या देयकासंदर्भात प्रकल्प भेट व मंजुरीसाठी रुपये १ लाख ८४ हजार इतक्या रकमेची लाच घेतांना नवी मुंबईतील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०२५ रोजी त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०२५) :(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३)

I. सदर प्रकरणी तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान आलोसे क्र.१, उप कार्यकारी अभियंता, एम.एस.ई.डी.सी.एल, स्थापत्य उप विभाग,पेण कॅम्प, पनवेल व आलोसे क्र.२, कनिष्ठ अभियंता, एम.एस.ई.डी.सी.एल, स्थापत्य उप विभाग,पेण कॅम्प, पनवेल यांनी तक्रारदार यांच्याकडे पाली स्विचींग सेंटर, सुधागड, जिल्हा-रायगड या ठिकाणाच्या मेंटनन्सच्या कामाचे मंजुर झालेले बिल अदा करण्यासाठी व मुरूड जंजिरा, जिल्हा-रायगड येथील एम.एस.ई.डी.सी.एल. या कार्यालयाचे पुर्ण झालेल्या सिव्हील वर्कचे कामाच्या साईट व्हिजीटकरिता असे प्रत्येकी रु.९२,०००/- प्रमाणे दोन्ही कामाचे मिळून एकूण रु.१,८४,०००/- इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

II. सदर लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आल्याने त्यांच्याविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे गु.र.नं. २०५/२०२५, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ प्रमाणे दिनांक २६/४/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा सखोल तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात येत आहे.

III. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दाखल केलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने संबंधित दोन्ही आलोसे यांना दिनांक

२९/०४/२०२५ रोजीच्या आदेशान्वये पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच दिनांक २६/०४/२०२५ पासून सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.
IV. या प्रकरणी सखोल चौकशीसाठी समितीची नेमणूक करण्यात आली असून चौकशी समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याची बाब विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

देवीभोयरे (ता.पारनेर, जि.अहिल्यानगर) या गावातील दारू विक्री व अवैध धंदे बंद करण्याबाबत

(३६) ७२८७ (१९-०९-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवीभोयरे (ता.पारनेर, जि.अहिल्यानगर) या गावातील दारू व अवैध धंदे बंद करण्यासाठी पारनेर पोलिस ठाण्यासमोर ग्रामस्थांनी बेमुदत उपोषण सुरू केले असल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देवीभोयरे परिसरात दारूबंदी तसेच अवैध धंदे बंद होण्यासाठी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक, तहसीलदार, पोलिस निरीक्षक तसेच संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांना आठ दिवसांपूर्वी निवेदन पाठविले असतांना देखील संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या निवेदनाची दखल न घेतल्याने ग्रामस्थांनी बेमुदत उपोषणाचा मार्ग अवलंबला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास तसेच पारनेर तालुक्यात दारू विक्री, मटका ,जुगार इत्यादी अवैद्य धंदे मोठ्या प्रमाणात सुरू असून पोलीस प्रशासन जुजबी कारवाया करत असल्यामुळे गावागावातील अवैद्य धंदे पुन्हा सुरू होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पारनेर तालुक्यातील अवैद्य धंदे बंद करण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

दि. २६ एप्रिल, २०२५ रोजी देवीभोयरे (ता.पारनेर, जि.अहिल्यानगर) या गावातील दारु व अवैध धंदे बंद करण्यासाठी पारनेर पोलिस ठाण्यासमोर बेमुदत उपोषण करण्यासाठी अर्जदार श्री. नितेश जयवंत गायकवाड हा इसम व त्यासोबत त्याचे आई, वडील, भाऊ, बहीन व आत्या हेच उपोषणास बसलेले होते. त्यानंतर दि. २८.०४.२०२५ रोजी सकाळी उपोषण सोडण्यात आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

गावातील ग्रामस्थांनी दारुबंदी व अवैध धंदे बंद होण्यासाठी जिल्हा पोलिस अधीक्षक, पोलिस निरीक्षक तसेच संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांना कोणतेही लेखी निवेदन दिलेले नाहीत. मात्र, मा. पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री यांचे स्वीय सहाय्यक यांचे दि. २६.०४.२०२५ रोजीचे पत्र जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्याकडुन पोलीस अधिक्षक कार्यालयास प्राप्त असुन ते पुढील कार्यवाहीसाठी दि. २७.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उ.वि.पो.अ/पो.नि/स.पो.नि. पारनेर, पो.स्टे. यांना पाठविण्यात आले आहे.

सदरच्या पत्रामध्येही निवेदन दिल्याबाबत उल्लेख नसून उपोषणाबाबत वृत्तपत्रातील बातमीच्या अनुषंगाने वस्तुनिष्ठ अहवाल मा. पालकमंत्री यांना सादर करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

तसेच देवीभोयरे परिसरातील ग्रामस्थांनी निवेदन दिले नसुन फक्त नितेश जयवंत गायकवाड यांनी एकट्यानेच वैयक्तिक आकसापोटी निवेदन दिल्याचे दिसुन येते. कारण उपोषणकर्ते नितेश गायकवाड यांनी उपोषण सोडल्यानंतर त्यांच्याच घरी दारु मिळुन आल्याने त्यांच्यावर दि. २९.०४.२०२५ रोजी गु.र.नं. ४३४/२०२५, मु.प्रो.ॲक्ट ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आली आहे.

तसेच उपोषण करण्यापुर्वी उपोषण कर्ते यांचे वडील जयवंत उर्फ बंडु आप्पा गायकवाड यांच्याविरुध्द दारुबंदी

कायद्यान्वये एकुण सन २०२२-२३ मध्ये ३ गुन्हे दाखल आहेत. सदर उपोषणकर्ते हेच सराईत अवैध दारुविक्रेते आहेत. त्यामुळेच त्यांच्यावर झालेल्या कारवायांमुळे तसेच भविष्यात कारवाई होवु नये याकरिता पोलीसांवर दबाव टाकण्यासाठी त्यांनी उपोषणाचा मार्ग अवलंबुन उपोषणासारखे दबावतंत्राचा वापर केलेला आहे.
(३) पारनेर तालुक्यात अवैध दारुविक्री व मटका जुगार या शिर्षाखाली दाखल गुन्ह्यांची संख्या सन २०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये व सन २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये कमी झाल्याची दिसुन येते. तसेच सदरच्या दाखल गुन्ह्यांवर कारवाई करुन मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
(४) अहिल्यानगर पोलीस दलामार्फत अवैध धंद्यांवर कारवाईसाठी स्थानिक गुन्हे शाखेच्या मार्फतीने वेळोवेळी कारवाई करण्यात येत आहे. याबाबत प्रत्येक माहिण्यात पोलीस अधिक्षक गुन्हे परिषद घेत आहेत. याप्रकारच्या गुन्ह्यांवर आळा बसविण्यासाठी मुंबई पोलीस कायदा कलम ९३ प्रमाणे एकुण ५८ केसेस करण्यात आल्या आहेत.
तसेच वारंवार दारुविक्री करण्याऱ्या आरोपींवर दोन किंवा जास्त गुन्हे दाखल झाल्यास सदर आरोपींविरुध्द तडीपारीचा प्रस्ताव सादर करण्याची दक्षता घेतली जात आहे. गावांमध्ये जास्तीत जास्त प्रमाणात कारवाया करुन प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला जात आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

कडेगाव (जि.सांगली) येथील कृषी विभागातील जिल्हा गुणवत्ता निरीक्षकांनी लाच घेतल्याबाबत

(३७) ७३४८ (१९-०९-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कडेगाव (जि.सांगली) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामध्ये पॅरागॉन ॲग्री केअर या शेती किटकनाशक कंपनीच्या नव्याने बांधलेल्या इमारतीचा निरीक्षण अहवाल देण्यासाठी ३० हजार रुपयांची लाच घेताना कृषी विभागातील जिल्हा गुणवत्ता निरीक्षक यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजी वा त्या दरम्यान रंगेहाथ पकडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०२५) : (१) व (२)
I. सदर प्रकरणी तक्रारदार यांनी दिनांक २३/०४/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली यांच्याकडे केलेल्या लाच मागणी तक्रारीच्या अनुषंगाने, तक्रारदार यांच्या कृषी औषध कंपनीच्या इमारतीचा इन्स्पेक्शन रिपोर्ट (Inspection Report) प्रत्यक्षात इन्स्पेक्शन न करता देण्याकरिता आलोसे, कृषी अधिकारी (जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक), जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालय, सांगली यांनी रु.३०,०००/- इतक्या लाचेच्या रकमेची मागणी केल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान निष्पन्न झाले.
II. तदनंतर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांना पंचासमक्ष सदर लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आल्याने त्यांच्याविरुद्ध विश्रामबाग पोलीस स्टेशन, सांगली येथे गु.र.नं.१२३/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ प्रमाणे दिनांक २४.०४.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा सखोल तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरु आहे.
III. दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने आलोसे, कृषी अधिकारी (जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक), सांगली यांना दिनांक २९.०५.२०२५ रोजीच्या शासन आदेशान्वये अटक केल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक २४.०४.२०२५ पासून मानीव निलंबित करण्यात आले आहे.
IV. तसेच आलोसे यांच्याविरुद्ध म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम ८ अन्वये दोषारोपपत्र बजावून विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबई उपनगरातील बांद्रा संकुलात (बी.के.सी.) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे पर्यावरण भवन बांधण्याबाबत

(३८) ७४५७ (०७-०८-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.संजय मेश्राम (उमरेड) : सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील बांद्रा संकुलात (बी.के.सी.) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे पर्यावरण भवन बांधण्याचा निर्णय दिनांक ५ एप्रिल, २०२५ रोजी वा त्या दरम्यान घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यावरण भवन बांधण्यासाठी मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाने ३४०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड भाडयाने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्यावरण भवन बांधण्याचे स्वरुप काय आहे व त्याकरिता अंदाजित किती खर्च लागणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे पर्यावरण भवन बांधण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (११-११-२०२५) :(१) मंडळाच्या १७१ व्या बैठकीत मंडळास जागेची कमतरता भासत असल्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास मुंबई शहरात भुखंड अथवा इमारत उपलब्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

(२) हे खरे नाही.

प्रस्ताव प्रलंबित आहे.

(३), (४), (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील पोलिस कर्मचारी गृहकर्जापासून वंचित असल्याबाबत

(३९) ७७९९ (१९-०९-२०२५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.रविशेठ पाटील (पेण), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलिस अंमलदार पदापर्यंतच्या पोलिस कर्मचाऱ्यांना स्वतःचे हक्काचे घर घेण्यासाठी त्यांना सहज कर्ज उपलब्ध व्हावे म्हणून पोलिस विभागामार्फत डीजीलोन (DGLOAN) ही योजना राबवण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सुमारे ५४५९ कर्मचाऱ्यांनी डीजीलोन योजनेअंतर्गत माहे ऑगस्ट, २०२३ पासून ते आजपर्यंत अर्ज दाखल केले असून शासनाकडून त्यातील एकाही कर्मचाऱ्याचा अर्ज मंजूर करण्यात आला नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेअंतर्गत गृहकर्जासाठी एकाही पोलिस कर्मचाऱ्याचा अर्ज मंजूर न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर योजनेअंतर्गत आलेल्या अर्जाची तात्काळ छाननी करून पात्र पोलिस कर्मचाऱ्यांना तात्काळ गृहकर्ज वितरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१०-२०२५) : (१) होय.

(२), (३) व (४) पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांनी शिफारस केल्यानुसार, राज्यातील पोलीस दलातील अधिकारी-अंमलदार यांच्यासाठी घरबांधणी अग्रीमाकरीता दि. ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंत प्राप्त ५४५९ अर्जदारांकरीता आवश्यक असणारी रु. १७६८.०८ कोटी इतकी रक्कम विविध बँका / वित्तीय संस्था यांच्याकडून दरपत्रके मागवून न्यूनतम व्याजदराने नवीन कर्ज उभारणी करण्यासाठी वित्त विभागाच्या सहमतीने काही अटींच्या अधीन राहून दिनांक ११/९/२०२५ शासन पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राजुरा, कोरपना, गडचांदूर, गोंडपिंपरी व जिवती (जि. चंद्रपूर) येथील पोलीस स्टेशन अंतर्गत कामे करण्याबाबत

(४०) ८०५१ (१४-०८-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा, कोरपना, गडचांदूर, गोंडपिंपरी व जिवती येथील पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीस स्टेशन येथे नवीन इमारत, सभागृह, पोलीस कर्मचारी वसाहतीचे बांधकाम, तसेच शहरात सी.सी.टी.व्ही. करिता निधी मंजुर करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (राजुरा) यांनी मा.मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांना दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निवेदने देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०२५) : (१) होय.

(२) सदर निवेदनातील पोलीस स्टेशन राजुरा करिता प्रशासकीय इमारतीचे काम पूर्ण झाले असून इमारत हस्तांतर करण्यात आली आहे. तसेच राजुरा येथील पोलीस अधिकारी व कर्मचा-यांकरिता १०२ निवास्थान बांधकामाचा प्रकल्प प्रगतीपथावर असून ३५ टक्के काम पूर्ण झाले आहे. तसेच पोलीस स्टेशन, कोरपना, गडचांदूर, गोंडपिंपरी व जिवती येथील प्रशासकीय इमारती सुस्थितीत असुन कार्यान्वीत आहे. गृह विभाग, शासन पत्र दि. २४/०९/२०२५ अन्वये विविध घटकाच्या बांधकामाच्या प्राधान्यक्रम यादीस शासन मंजूरी देण्यात आली असून यामध्ये पोलीस स्टेशन, कोरपना व जिवती येथील पोलीस अधिकारी/अंमलदार यांचेकरिता शासकीय निवासस्थानाचे बांधकामाच्या कामाचा समावेश आहे. यानुसार पोलीस गृहनिर्माण महामंडळाकडून पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच सीसीटीव्ही कॅमे-यासंदर्भात मा. जिल्हाधीकारी, चंद्रपूर यांना जिल्हा खनिज प्रतिष्ठान (DFMs) मधून निधी मंजूर होणेबाबत विनंती करण्यात आलेली असून निधी प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

माजलगाव नगर परिषद (जि.बीड) यांची केलेली फसवणुक

(४१) ८३८६ (१९-०९-२०२५). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगाव, नगर परिषद (जि.बीड) यांची फसवणुक केल्याप्रकरणी माजलगाव शहर जि.बीड येथे गुन्हा क्र.१८०/२०२५ कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ भादंवी नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने चौकशी करुन संबंधित आरोपींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

नगर परिषद, माजलगाव जि.बीड यांची फसवणुक केल्याप्रकरणी माजलगाव शहर, पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्र.१८०/२०२५ कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ भा.द.वी. नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे

(२) सदर गुन्ह्यातील एकुण ५ आरोपींपैकी आरोपी क्र.१ यास अटक करण्यात आली असुन त्यास न्यायालयीन कोठडी मंजुर करण्यात आली आहे. आरोपी क्र. २ यास मा. न्यायालयाने अटकपुर्व जामीन मंजुर केला आहे व उर्वरित आरोपी क्र. ३ ते ५ यांना मा. न्यायालयाने तात्पुरता जामीन मंजुर केला आहे.

(३) सदर गुन्ह्यात एकुण ३ साक्षीदारांचे बी.एन.एस.एस. कलम १८३ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आले आहे. गुन्ह्यातील वादग्रस्त कागदपत्रे हस्तगत करण्यात आले असुन आरोपी क्र. ३ ते ५ यांचे जामीन रद्द होण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

सद्यस्थितीत सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

इचलकरंजी (जि.कोल्हापूर) शहरात घरफोड्या, चोरी व खून यांचे प्रमाण वाढल्याबाबत

(४२) ८७१५ (१९-०९-२०२५). श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) शहरात गेल्या काही दिवसांमध्ये घरफोड्या, चोरी, खून यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून, माहे मे, २०२५ मध्ये आमराई रस्ता परिसरात सलग दोन घरफोड्या झाल्या असून पोलीसांना चोरट्यांना पकडण्यात अपयश आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वाढते खून, मारामारी व दहशत निर्माण करणे, चोरी व घरफोडीचे प्रमाण रोखण्याबाबत कोणती सक्षम यंत्रणा वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०२४ वर्षाच्या तुलनेत सन २०२५ या वर्षामध्ये मध्ये घरफोडया, चोरी, खुन यांचे प्रमाण कमी झालेले आहेत. तपशिल पुढील प्रमाणे आहे.

गुन्हे सन २०२४ जानेवारी ते मे सन २०२५ जानेवारी ते मे वाढ/घट

दाखल उघड दाखल उघड

खुन ३ ३ २ २ -१

घरफोडी १९ ७ १५ ३ -४

चोरी १०५ ३४ ८५ १८ -२०

तसेच माहे मे, २०२५ मध्ये इचलकरंजी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील आमराई रस्ता परिसरात दोन घरफोडीच्या घटना घडल्या असुन त्याबाबत इचलकरंजी पो.स्टे. येथे अज्ञात आरोपी विरुध्द गु.र.नं १६६/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०५,३३१(३), ३३१(४) प्रमाणे व गु.र.नं. १६८/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) नोंद करण्यात आलेली आहे.

सदरहु गुन्हे दाखल झाल्यानंतर घटनास्थळी श्वानपथका कडुन अज्ञात आरोपींचा मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे व अंगुली मुद्रा तज्ञ यांच्याकडुन घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण केले असता आरोपींच्या अंगुली मुद्रा मिळुन आलेल्या नाहीत. तसेच सदरहु गुन्ह्यांबाबत रेकॉर्डवरिल गुन्हेगारांची सुध्दा तपासणी करण्यात आली असुन अज्ञात आरोपींच्या शोधासाठी पोलीस ठाणे स्तरावरील अधिकारी व अंमलदार यांचे पथक स्थापन करुन त्यांच्याकडुन शोधकार्य सुरु आहे.

(२) होय, वरीलप्रमाणे गुन्ह्यांचे कामी तपास पथक स्थापन करुन अज्ञात आरोपींचा तसेच चोरीस गेलेल्या मुद्देमालाचा शोध घेण्यात येत आहे.

(३) सदर गुन्हयांचे प्रमाण रोखण्याकरिता पोलीस ठाणे स्तरावर सक्त पेट्रोलिंग तसेच रात्रगस्त करण्यात येत आहे. तसेच गुन्हे प्रकटकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांच्याकडुन रेकॉर्डवरील गुन्हेगार तसेच कारागृहातुन बाहेर आलेले आरोपींवर लक्ष ठेवून त्यांची वेळोवेळी तपासणी केली जात आहे.

तसेच रेकॉर्डवरिल गुन्हेगार यांच्यावर महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५५ अन्वये चार टोळ्यांमधील २१ गुन्हेगारांवर कारवाई करण्यात आली असनु कलम ५६ अन्वये ११ गुन्हेगारांना कोल्हापुर जिल्ह्यातुन हद्दपार करण्यात आले आहे.

इचलकरंजी शहरातील तीन पोलीस ठाणे हद्दीतील १०१७ आरोपींकडुन अशाप्रकारे गुन्हेगारी कृत्य घडु नये याबाबत त्यांच्याकडुन चांगल्या वर्तवणुकीचा बॉण्ड करुन घेण्यात आला आहे.

तसेच गुन्हे प्रवण परिसराचा अभ्यास करुन इचलकरंजी शहरामध्ये १७८ संवेदनशील ठिकाणी क्युआर कोड बसविण्यात आले असुन पोलीस अंमलदारांकडुन सतर्क पेट्रोलिंग केली जात आहे. व महत्वाच्या ठिकाणी नाकाबंदीचे आयोजन करुन गुन्ह्यांना आळा घालण्यात येत आहे.

(४) विलंब नाही.

मुंबईतील भांडुप (पश्चिम) येथील नरदास नगर, टेंभीपाडा रोड येथील परिसरात होत असलेल्या घरफोड्यांबाबत

(४३) ९३०३ (१९-०९-२०२५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भांडुप (पश्चिम) येथील नरदास नगर, टेंभीपाडा रोड येथील परिसरात तसेच इतर ठिकाणी घरफोड्या करणाऱ्या कुप्रसिद्ध गुन्हेगारांची संख्या वाढली असून सदर चोरी प्रकरणात दागिने, मोबाईल फोन आणि रोख रक्कम यांचा समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आतापर्यंत किती घरफोड्या झाल्या असून, यातील गुन्हेगारांना पकडण्यासह हस्तगत करण्यात आलेला मुद्देमाल परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१०-२०२५) :(१) होय, हे अंशत: खरे आहे. सदर प्रकरणी भांडुप (पश्चिम), मुंबई येथील नरदास नगर, टेंभीपाडा रोड येथील परिसरात तसेच इतर ठिकाणी घरफोड्या करणाऱ्या कुप्रसिध्द गुन्हेगारांची संख्या वाढली नसुन सन २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये घरफोडी गुन्हयाचे प्रमाण कमी झाले आहे. सदर प्रकरणी तपासात दागिने, मोबाईल फोन आणि रोख रक्कम चोरी झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी सन २०२५ सालामध्ये भांडूप पोलीस ठाणे, मुंबई येथे एकुण १६ घरफोडीचे गुन्हे दाखल करण्यात आले असून दाखल गुन्हयापैकी एकुण ०७ गुन्हे उघडकीस आले असुन त्यामध्ये ०७ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे तसेच तपासात हस्तगत केलेल्या मालमत्ता संबंधीतांना न्यायालयाच्या आदेशाने परत करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप व वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात अवैध धंदे आणि चोऱ्या होत असल्याबाबत

(४४) १०८३१ (१९-०९-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप व वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात अनेक अवैध धंदे आणि चोऱ्या होत असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंद्रूप, वळसंग पोलीस हद्दीत होणारे अवैध धंदे आणि चोऱ्या रोखण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०२५) :(१) हे अशंत: खरे आहे

सन २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये सदर गुन्ह्यांचे प्रमाणे कमी झालेले आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप व वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोऱ्या आणि अवैध धंदयावर परिणाम कारक कारवाई करण्यात आलेली असुन माहे मे,२०२५ अखेर पर्यंतचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

मंद्रुप पोलीस ठाणे हद्दीतील अवैध धंदे /चोऱ्या, घरफोडया इ. बाबत करण्यात आलेली कारवाई:-

गुन्हे एकुण केसेस कारवाई

जुगार २९ रु. ७,०५,१११/- इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दारुबंदी ६७ रु. ३,७५,८३५/- इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

चोरी/ घरफोडया ०५ ०५ पैकी ०३ गुन्हे उघड करुन आरोपींना अटक करण्यात आली असुन

रु. ७९,३००/- इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(कृ.मा.प.)

वळसंग पोलीस ठाणे हद्दीतील अवैध धंदे /चोऱ्या, घरफोडया इ. बाबत करण्यात आलेली कारवाई:-

गुन्हे एकुण केसेस कारवाई

जुगार २६ रु. ४,२३,३८०/- इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दारु ६४ रु. २,१७,७३५/- इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

चोरी ०७ ०७ पैकी ०३ गुन्हे उघड करुन रु. २,७५,५२०/- इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

घरफोडया ०३ ०३ पैकी ०२ गुन्हे उघड करुन रु. १,५५,४५५/- इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

उपरोक्त प्रमाणे अवैध धंदे/चोऱ्या, घरफोडया इ. गुन्ह्यांबाबत चौकशी करुन संबंधितांविरुध्द कारवाई करण्यात आली असुन सन २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये सदर गुन्ह्यांचे प्रमाणे कमी झालेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

छत्रपती संभाजीनगर येथील नशेच्या आहारी गेलेल्या शालेय विद्यार्थिनींबाबत

(४५) १०८५५ (०८-०९-२०२५). श्री.विलास भुमरे (पैठण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर येथील नशेच्या आहारी गेलेल्या शालेय विद्यार्थिनीला तिच्या आईच्या विनंतीवरून ताब्यात घेत रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी विद्यार्थीनीला व तिच्या सोबत असलेल्या इतर २ मुलींना नशा करण्यास प्रवृत्त करणाऱ्या तरुणांचा शोध सुरु असून विद्यार्थीनीच्या दोन मैत्रिणींची दामिनी पथकाने भेट घेऊन त्यांचे समुपदेशन केले आहे, हे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित नशा करण्याच्या साहित्याची विक्री करणाऱ्या दुकानदारा व सर्व संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात

येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०२५) :(१) होय.

(२)व(३) छत्रपती संभाजी नगर येथील शालेय विद्यार्थीनीला तिच्या आईने दिलेल्या अर्जावरुन ताब्यात घेवून दामिनी पथकाने पोलीस ठाणे जवाहरनगर येथे समूपदेशन केले. समूपदेशना दरम्यान, सदर अल्पवयीन मुलीस मानसिक उपचाराची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आल्याने आईच्या विनंतीवरुन दामिनी पथकाने सदर मुलीस तिच्या आईसह घेवून जावून कादरी हॉस्पीटल, पडेगांव येथे उपचारासाठी दाखल केले.

तसेच, सदर मुलीला अंमली पदार्थ सेवन केल्याने कशा प्रकारे शरीरावर दुष्परिणाम होतात व आरोग्यास कशाप्रकारे घातक आहेत याबाबत दामिनी पथकाद्वारे समुपदेशन करण्यात आले.

छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालय स्तरावर अंमली पदार्थाबाबत दामिनी पथकामार्फत सर्व शाळा, महाविद्यालय येथे वेळोवेळी भेटी देवून व कार्यशाळा घेवून जनजागृती करण्यात आली. सन २०२४ ते जून २०२५ या कालावधीतील जनजागृती/कार्यशाळा यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

सन	शाळा / महाविद्यालयाला दिलेल्या भेटींची संख्या	कार्यशाळा संख्या	कार्यशाळेत भाग घेतलेली जनसंख्या
२०२४	३८९	२५७	४३,८८०
जून २०२५ अखेर	१००	६५	३३,७३०

पोलीस आयुक्तालय छत्रपती संभाजीनगर घटकामध्ये अवैध अंमली पदार्थ विक्री करणा-यांविरुद्ध प्रभावीपणे कार्यवाही करण्यासाठी अंमली पदार्थ प्रतिबंध पथकाची स्थापना करण्यात आली असून त्या पथकामार्फत सन २०२४ व जून २०२५ या कालावधीत अंमली पदार्थ ताबा, विक्री, सेवन करणाऱ्यांवर केलेल्या कारवाईचा तपशील खालील प्रमाणे आहे.

सन	NDPS अंतर्गत दाखल गुन्हे	आरोपी संख्या	जप्त मुद्देमाल
२०२४	१४५	२४३	८०,२९,९१०/-
जून २०२५ अखेर	२२५	२४७	१,६५,५६,८१०/-
एकूण	३७०	४९०	२,४५,८६,७२०/-

शाळा, महाविद्यालय परिसरात हातगाडी, टपऱ्या इत्यादी मधून विदयार्थ्यांना अंमलीपदार्थ विक्री करत असल्याबाबतची माहिती निदर्शनास येताच, अंमलीपदार्थ विक्री करणाऱ्या ७० ते ८० टपऱ्या, हातगाडया यांच्या विरुध्द छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांच्यासोबत संयुक्त कारवाई करुन ६००० अतिक्रमण निष्कासित करण्यात आली आहेत.

अंमलीपदार्थ तस्करी रोखण्यासाठी वेळोवेळी छत्रपती संभाजीनगर शहरातील मेडीकल स्टॉकीस्ट व मेडीकल रिटेल विक्रेते यांची बैठक घेवून नशेसाठी वापरण्यात येणाऱ्या गोळ्या व औषंधी बाबत त्यांची तस्करी होणार नाही, याकरीता नियमानुसारच त्यांची विक्री करण्याबाबत व कायदेशीर तरतुदींचे पालन करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(४)प्रश्न उद्‌भवत नाही.

यवत (ता.दौंड, जि.पुणे) येथील पोलीस स्टेशन बांधकामासाठी वाढीव निधीसह सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत

(४६) ११२०२ (०७-०८-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवत (ता.दौंड, जि.पुणे) येथील पोलीस स्टेशन बांधकामासाठी वाढीव सुमारे १४ कोटी ४९ लक्ष रुपये निधीसह सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणे व कार्यन्वयन यंत्रणा म्हणून सार्वजनिक बांधकाम विभाग नियुक्त करणेबाबतची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ७ मे, २०२५ रोजी वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांचेकडे पत्राद्वारे

वि.स. १७ (32)

केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, यापूर्वी मंजूर करण्यात आलेली सुमारे ३ कोटी ५० लक्ष रुपये अपुरी पडत आहे, हेही खरे आहे काय

(३) असल्यास, १४ कोटी ४९ लक्ष रुपये निधीसह सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणे व कार्यन्वयन यंत्रणा म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०२५) :(१) व (२) होय

(३) लोकप्रतिनिधींच्या निवेदनातील विनंतीनूसार यवत पोलीस स्टेशनचे बांधकाम करण्यासाठी कार्यान्वयन यंत्रणा म्हणून सार्वजनिक बांधकाम विभाग यांची नियुक्ती करण्यास शासनाने मान्यता दिली असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास दि. १६/०९/२०२५ रोजीच्या शासन पत्रान्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयास कळविण्यात आले आहे. यानुसार प्रस्तुत कामास प्रशासकीय मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उदभवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील विविध गाव तलावांच्या संवर्धनासाठी राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत प्रस्ताव सादर केल्याबाबत

(४७) १२४७७ (३०-०७-२०२५). श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) : सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील विविध गाव तलावांच्या संवर्धनासाठी राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत प्रस्ताव सादर करण्यात आल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावांची सद्यस्थिती काय आहे तसेच यासाठी किती निधी देण्यात आला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०३-११-२०२५) :(१) हे खरे आहे.

(२) • राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत प्राप्त प्रस्तावांची विभागस्तरावर छाननी करण्यात येते व छाननीनंतर सदर प्रस्ताव सुकाणू समितीसमोर सादर करण्यात येतात. सुकाणू समितीमार्फत शिफारसप्राप्त तलावांना प्रशासकीय मान्यता व निधी वितरित करण्याबाबत शासन मान्यतेनंतर शासन निर्णय निर्गमित करण्यात येतो.

• राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत दि.३०.०९.२०२५ रोजीपर्यंत कोल्हापूर जिल्ह्यातील नव्याने एकूण ३२ तलाव संवर्धन प्रस्ताव शासनास प्राप्त झालेले असून राज्य सरोवर संवर्धन योजनेसाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात एकूण रक्कम रू.६० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

• राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत अर्थसंकल्पित करण्यात आलेला निधी व सद्यस्थितीत कामे चालू असलेले तलाव संवर्धन प्रकल्पांसाठी राज्य शासनाचे दायित्त्व विचारात घेऊन नवीन तलाव संवर्धन प्रस्तावांना सुकाणू समितीच्या शिफारशींनुसार प्रशासकीय मान्यता व निधी वितरण करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मंत्रालय (मुंबई) येथे बनावट पास असलेल्या वाहनांना प्रवेश दिल्याबाबत

(४८) १२६०८ (१९-०९-२०२५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंत्रालय हे ठिकाण राज्यातील अतिसंवेदनशील ठिकाणांपैकी एक असल्यामुळे मंत्रालयात प्रवेश देताना सर्वसामान्य व्यक्तींना अनेक तपासणी प्रक्रियांमधून जावे लागत असून मंत्रालयीन कर्मचारी आणि पत्रकारांना आपला चेहरा स्कॅन केल्यानंतरच प्रवेश दिला जातो हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंत्रालयातील परिसरातील वाहनतळावर उभ्या असलेल्या गाडीवर बनावट पास असल्याचे पोलिस

कर्मचाऱ्यांच्या लक्षात आले असता, तपासाअंती सदर वाहनात हापूस आंब्याच्या पेट्या आढळल्याची माहिती दिनांक २५ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पेहलगाम सारख्या दहशतवादी हल्ल्यानंतर कडक बंदोबस्त असतानाही मंत्रालयासारख्या ठिकाणी बनावट पास असलेले वाहनाने थेट आतमध्ये प्रवेश केला असता सदर प्रकरणी वाहन चालकाकडे जाब विचारत असताना संबंधित वाहन एका मंत्र्याच्या ताफ्यातील असून वरील प्रकरणाबाबत पोलिसांना शांत राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशा प्रकारे बनावट पास लावून सहज मंत्रालयात प्रवेश केलेल्या वाहनांवर कोणतीच कारवाई न केल्याने मंत्रालयात सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधिताविरुद्ध कार्यवाही करुन मंत्रालयात सुरक्षा व्यवस्था बळकट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१०-२०२५) :(१)होय, हे खरे आहे.

मंत्रालय ही अत्यंत संवेदनशील व महत्त्वाची आस्थापना असल्याने सदर आस्थापनेची सुरक्षा ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. त्याअनुषंगाने मंत्रालय सुरक्षा प्रकल्प फेज-२ ची अंमलबाजवणी मंत्रालय स्तरावर सुरु असून Visitor Management System अंतर्गत अभ्यागतांना तसेच क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी/पत्रकार/ वकील यांना मंत्रालय प्रवेशासाठी DigiPravesh या ॲपआधारे नोंदणी करुन Facial Recognition System व्दारे मंत्रालयात प्रवेश देण्यात येत आहे.

मंत्रालय सुरक्षा प्रकल्प फेज-II अंतर्गत गार्डन गेट जवळ अभ्यागतांचे प्रवेशाकरीता Visitor Plaza तयार करण्यात आला आहे. मंत्रालय व परिसरात कोणतीही अनुचित घटना किंवा प्रकार घडू नये करीता मंत्रालय सुरक्षेच्या दृष्टिने प्रवेशावेळी अभ्यागतांची फ्रिस्किंग, डी.एफ.एम.डी.व एच.एच.एम.डी.मार्फत तसेच त्यांचे कडील सामान/बॅगेची बॅग स्कॅनर मार्फत सुरक्षा तपासणी करुन मंत्रालयात प्रवेश देण्यात येतो.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) मंत्रालय संवेदनशील मर्मस्थळ असल्याने मंत्रालय सुरक्षेच्या अनुषंगाने मंत्रालयात प्रवेश करणारे अभ्यांगत / खाजगी वाहने यांची सुरक्षा तपासणी केल्यानंतरच मंत्रालयात प्रवेश दिला जातो.

मंत्रालयात वाहनांचे प्रवेशावेळी किंवा परिसरात तपासणी दरम्यान काही संशयास्पद व आक्षेपार्ह बाब निदर्शनास आल्यास संबधीतांना मरिन ड्राईव्ह पो.ठाणे येथे पुढील कार्यवाही करीता पाठविण्यात येते.

सन २०२५ करीता मंत्रालयात वाहनांद्वारे प्रवेश अनुज्ञेय असणाऱ्या तसेच अत्यावश्यक प्रसंगी मंत्रालयात बैठकांकरिता उपस्थित राहणाऱ्या निमंत्रितांना मा.मंत्री कार्यालय/विविध विभागांचे सचिव व त्यावरील अधिकारी यांचेकडून उप आयुक्त, मंत्रालय सुरक्षा, मंत्रालय, मुंबई यांना निर्देश दिल्यास सदर वाहनांची योग्य ती सुरक्षा तपासणी करून मंत्रालयात प्रवेश देण्यात येतो.

ठाणे जिल्ह्यातील मिरा भाईंदर शहरातील रस्त्यांवर फिरणाऱ्या बहुसंख्य टॅंकरमधून पाणी गळती होत असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत.

(४९) १३७६० (१९-०९-२०२५). श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील मिरा भाईंदर शहरामधून रस्त्यांवर फिरणाऱ्या बहुसंख्य टॅंकरमधून पाण्याच्या होणाऱ्या गळतीमुळे रस्ते निसरडे होत असून अपघाताचा धोका वाढला असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा टॅंकर चालकांविरोधात कारवाई करण्याची मागणी पालिकेने वाहतूक पोलीसांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येतआहे,

वि.स. १७ (34)

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.

(२) मिरा-भाईंदर शहरामधून रस्त्यांवर फिरणाऱ्या टँकरमधून पाणी वाहून रस्ते निसरडे होऊन अपघात घडतात याबाबत टँकरवर कारवाई करावी याबाबत मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्याकडून मिरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालय कार्यालयास पत्रव्यवहार प्राप्त आहे.

(३) मिरा-भाईंदर शहरामधील रस्त्यांवर फिरणाऱ्या टँकरमधून पाणी पडून अपघात होऊ नये याकरिता २९ कसुरदार वाहन चालकांवर वाहतूक विभागाकडून महाराष्ट्र व्हेहीकल ॲक्ट (एम.एम.व्ही.आर) २०२/१७७ प्रमाणे) कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत झोपडी परिशिष्ट दोन मध्ये सहभागी करून घेण्यासाठी झोपडपट्टी धारकांकडे लाचेची मागणी केल्याबाबत

(५०) १५४६३ (०८-०९-२०२५). श्री.सुरेश धस (आष्टी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत झोपडी परिशिष्ट दोन मध्ये सहभागी करून घेण्यासाठी झोपडपट्टी धारकांकडे साडेसहा लाख रुपयाच्या लाचेची मागणी करणारे कार्यकारी अभियंता, श्री.दिनेश श्रेष्ठ, कंत्राटदार, श्री.संजय त्रिवेदी, रिक्षाचालक, श्री.राजकुमार यादव यांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने अटक करून बोरीवली मुंबई येथील पोलीस स्टेशनमध्ये त्यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केल्याची बाब दिनांक ६ फेब्रुवारी, २०२५ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सर्व संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१०-२०२५) : (१), (२) व (३)

I. सदर प्रकरणी फिर्यादी यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, शासनाच्या अभय योजनेअंतर्गत त्यांच्या काकाच्या नावे असलेली रुम फिर्यादी यांच्यानावे हस्तांतरण करण्यासाठी आलोसे क्र.१, कार्यकारी अभियंता (म्हाडा), बोरीवली विभाग/मुंबई मंडळ, बांद्रा, मुंबई यांनी फिर्यादी यांच्याकडे त्यांच्या व इतर १० झोपडपट्टीधारक यांच्या प्रलंबित कामासाठी प्रत्येकी ६०,०००/- असे एकूण रु.६,६०,०००/- इतक्या लाचेच्या रकमेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम आरोपी क्र.२, म्हाडा खाजगी कॉन्ट्रक्टर यांच्याकडे देण्यास सांगितल्याचे पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान निष्पन्न झाले.

II. तदनंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात आलेल्या सापळा कारवाई मध्ये आरोपी क्र. २ खाजगी इसम याने रु.६०,०००/- इतकी लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारुन ती आरोपी क्र. ३, रिक्षा चालक (खाजगी इसम) याच्याकडे दिली असता, सापळा पथकाने नमूद दोन्ही खाजगी इसम यांना ताब्यात घेवून त्यांचेकडून लाचेची रक्कम हस्तगत केली.

III. म्हणून या प्रकरणी तिन्ही आरोपीतांविरुद्ध फिर्यादी यांनी दिलेल्या प्रथम खबरी अहवालावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, येथे गु.र.क्र. ०६/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) च्या कलम ७, ७(अ), १२ प्रमाणे दिनांक ०५.०२.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचा सखोल तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरु आहे.

IV. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने तिन्ही आरोपींना त्याच दिवशी अटक करण्यात आली असून दिनांक ११.०२.२०२५ रोजी तीनही आरोपीतांना जामीन मंजूर करण्यात आलेला आहे.

V. सदर प्रकरणी म्हाडा प्राधिकरणाने आलोसे, कार्यकारी अभियंता (म्हाडा), बोरीवली विभाग/मुंबई मंडळ, बांद्रा, मुंबई यांना दिनांक १२.०३.२०२५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले होते.

VI. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २२.०४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार निलंबित आलोसे, कार्यकारी अभियंता (म्हाडा), यांना दिनांक ०६.०६.२०२५ रोजीच्या आदेशान्वये अकार्यकारी पदावर सेवेत पुन:स्थापित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन : **जितेंद्र भोळे**

नागपूर. **सचिव-१,**

महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.